RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




बुधवार, २५ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १७८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Wednesday, 25 June 2025 | Year : 5 | Issue : 178 | Daily | Rate: Rs. 5/-

## ... ही तर न्यायाची थट्टा : सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली :** एप्रिलमध्ये जामीन मिळाल्यानंतरही आरोपींना तुरुंगातून सोडणे हे न्यायाची थट्टा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने गाझियाबादच्या तुरुंग अधीक्षकांना समन्स बजावले आहे. याशिवाय उत्तर प्रदेशच्या तुरुंग महासंचालकांनाही व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की जामीन आदेशात उपकलम नसल्याची सबब चुकीची आहे आणि यावर चौकशी आवश्यक आहे. उत्तर प्रदेशातील धर्मांतर विरोधी कायद्याशी संबंधित एका प्रकरणात एप्रिलमध्ये जामीन मिळालेल्या एका व्यक्तीची अद्याप तुरुंगातून सुटका झाली नाही, ही न्यायाची थट्टा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी म्हटले. जामीन आदेशात उत्तर प्रदेश धर्मांतर प्रतिबंधक कायदा, 2021 च्या उपकलमाचा उल्लेख नसल्याने त्याची सुटका करण्यात आली नाही, असे त्या व्यक्तीने म्हटल्यावर न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन आणि एन कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. यावर, खंडपीठाने गाझियाबाद जिल्हा तुरुंगाच्या तुरुंग अधीक्षकांना 25 जून रोजी सर्वोच्च न्यायालयात वैयक्तिकरित्या हजर राहण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की हे प्रकरण 'अत्यंत दुर्दैवी परिस्थिती' दर्शवते. त्यामुळे, उत्तर प्रदेशच्या तुरुंग महासंचालकांनाही व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आता याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयाला 29 एप्रिलच्या आदेशात सुधारणा करण्याची आणि त्यात कलम 5 मधील उपकलम (1)

**न्यायाची थट्टा : जामीन आदेश असूनही एका व्यक्तीला सोडले नाही, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशच्या तुरुंगाधिकाऱ्याला समन्स बजावले.**

स्पष्टपणे समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. न्यायालयाने म्हटले आहे की एप्रिलच्या आदेशात आवश्यक कलमे आधीच नमूद केलेली आहेत. केवळ उपकलम नसल्यामुळे आरोपी अजूनही तुरुंगात आहे हे न्यायाचा अपमान आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. तथापि, न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या वकिलाला इशारा दिला की जर हे विधान खोटे असल्याचे निष्पन्न झाले तर कठोर कारवाई केली जाईल. न्यायालयाने म्हटले की, आम्ही तुम्हाला पुन्हा एकदा सांगत आहोत की, जर हे विधान खोटे असल्याचे निष्पन्न झाले किंवा तुम्ही इतर कोणत्याही प्रकरणात कोठडीत असाल तर गंभीर कारवाई केली जाईल.

**सर्वोच्च न्यायालय :** सर्वोच्च न्यायालयाने 29 एप्रिल रोजी आरोपीला जामीन मंजूर केला होता, तर गाझियाबादमधील एका कनिष्ठ न्यायालयाने 27 मे रोजी आरोपीला या अटीवर सोडण्याचा आदेश दिला होता की, जर इतर कोणत्याही प्रकरणात त्याची कोठडी आवश्यक नसेल तर त्याला जामिनावर सोडण्यात यावे. परंतु अलाहाबाद उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांमध्ये कायद्याच्या कलम 5 च्या उप-कलम (1) चा उल्लेख नसल्याने त्याला सोडण्यात आले नाही, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की 29 एप्रिलचा त्यांचा आदेश अगदी स्पष्ट होता आणि त्यात म्हटले आहे की आरोपीला खटल्याची सुनावणी सुरू होईपर्यंत जामीन मिळावा. या पुरुषावर यापूर्वी भारतीय दंड संहिता (आयपीसी) च्या कलम 366 (जबरदस्तीने लग्नासाठी महिलेचे अपहरण करणे) आणि धार्मिक धर्मांतर प्रतिबंधक कायदा, 2021 च्या कलम 3 आणि 5 (खोटेपणा, दबाव, फसवणूक किंवा लोभाने धर्मांतर करण्यास मनाई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

परंतु जर हे उपकलम कारण असेल तर आम्ही न्यायालयाचा अवमान करण्याची कारवाई सुरू करू, कारण ही स्वातंत्र्याची बाब आहे. सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले की, या न्यायालयाला हलके घेऊ नका. या प्रकरणाची आता पुन्हा सुनावणी 25 जून रोजी होईल.

## राहुल गांधींचा निवडणूक आयोगावर हेराफेरीचा आरोप



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर, काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर हेराफेरीचा आरोप केला होता. निवडणूक आयोगावर मतदार यादीतील अनियमितता आणि इतर निवडणूक अनियमिततेचे गंभीर आरोप करत आहेत, त्यामुळे निवडणूक आयोगाने सर्व निवडणूक मुद्द्यांवर राहुल गांधींशी एक-एक चर्चा करण्याचा आणि त्यांच्या निवडणूक शंका दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी, निवडणूक आयोगाने राहुल गांधींना मेल आणि पत्राद्वारे थेट चर्चेसाठी आमंत्रण पाठवले आहे. यासोबतच, त्यांना त्यांच्या सोयीनुसार तारीख आणि वेळ निश्चित करून आयोगाला कळवण्यास सांगण्यात आले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील अनियमिततेवर 7 जून रोजी राहुल गांधी यांनी लेख लिहिल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांना हे पत्र पाठवले आहे. निवडणूक आयोगाने 12 जून रोजी राहुल गांधी यांना हे पत्र मेलद्वारे पाठवले आहे आणि ते त्यांच्या निवासस्थानी स्वतःहून देखील पावतीसाठी पाठवले आहे.आयोग आता काँग्रेस पक्षासोबतच्या बैठकीत राहुल गांधींना प्रमुखतेने आमंत्रित करू इच्छित आहे, जेणेकरून निवडणुकीशी संबंधित त्यांच्या शंका दूर करता येतील. आयोगाने अलीकडेच काँग्रेस वगळता भाजप, बसपा, आप, सीपीआय आणि एनपीपी यांच्यासोबत बैठका घेतल्या आहेत. भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, बसपा सुप्रीमो मायावती, आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल, एनपीपी अध्यक्ष कोनराग संगमा आणि सीपीआय (एम) चे वरिष्ठ नेतृत्व या बैठकांमध्ये सहभागी झाले होते. राहुल गांधींना चर्चेसाठी लिहिलेल्या पत्रात आयोगाने म्हटले आहे की, निवडणूक आयोग संसदेने पारित केलेल्या कायद्यांनुसार आणि त्यानुसार बनवलेल्या नियमांनुसार कोणतीही निवडणूक घेतो.

## वंदे भारत ट्रेनमध्ये पावसाच्या पाण्याची गळती



**नवी दिल्ली :** वंदे भारत ट्रेन ही सेमी हायस्पीड ट्रेन आहे. मात्र, असे असूनही या ट्रेनमध्ये मिळणाऱ्या सुविधांवरून अनेकदा टीका होतांना पाहायला मिळत आहे. आता वंदे भारतच्या एका ट्रेनचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामध्ये पावसाच्या पाण्याची गळती वंदे भारत ट्रेनच्या एका डब्ब्यात होत असल्याचे दिसत आहे. हा व्हिडीओ एका प्रवाशी विद्यार्थ्याने शेअर केला आहे. देशात सेमी-हायस्पीड ट्रेनचे स्वप्न घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अनेकदा वेगवेगळे अनुभव येत आहेत. आता वाराणसीहून नवी दिल्लीला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनच्या सी 7 या कोचमधून प्रवास करत असताना छतावरून पावसाचं पाणी गळत असल्याचं पाहायला मिळाले आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ट्रेनच्या छतावरून पावसाचे पाणी गळत असल्यामुळे ट्रेनच्या डब्ब्यात पाणीच पाणी पाहायला मिळाले. एवढेच नाही तर पाणी गळत असल्याने प्रवाशाला तेथील काही आसनांवरही बसता येत नसल्याचे दिसून आले आहे.

## बॉम्ब टाकू नका, वैमानिकांना परत बोलवा : डोनाल्ड ट्रम्प



**नवी दिल्ली :** इराण आणि इस्त्रायल यांच्यात गेल्या काही दिवसांपासून संघर्ष सुरू आहे. यादम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर दोन्ही देशात शस्त्रविरामाबाबत एकमत झाले, मात्र याच्या काही तासांतच तेहरानने तेव अवीववर नव्याने क्षेपणास्त्र डागल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे. हे शस्त्रविरामाचे उल्लंघन असल्याचे इस्त्रायलने म्हटले आहे. दरम्यान, यानंतर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे इस्त्रायलवरही संतापले आहेत इराणवर बॉम्ब टाकू नका, तुमच्या वैमानिकांना परत बोलवा, जर तुम्ही असे केले तर ते एक मोठं उल्लंघन ठरेल, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले.

## 1 जुलैपासून रेल्वेचा प्रवास माहागणार?



**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वे विभाग रेल्वेच्या प्रवास भाड्यात मोठी वाढ करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. 1 जुलैपासून भारतीय रेल्वे प्रवासी भाडे वाढ करण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे रेल्वेचा प्रवास आता महागणार आहे. रेल्वेने भाडेवाढ केल्यास याचा फटका सर्वसामान्य जनतेला बसणार आहे. 1 जुलैपासून रेल्वे प्रवाशांना एक्स्प्रेसने प्रवास करायचा असेल तर जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. मागील काही वर्षांत भारतीय रेल्वेने प्रवास भाड्यात वाढ केली नव्हती. मात्र, आता भारतीय रेल्वेचा प्रवास महागण्याची शक्यता आहे. दरम्यान, ही भाडेवाढ ही किरकोळ स्वरुपाची असेल, असेही सांगितले जात असून 1 जुलै 2025 पासून हा निर्णय लागू होणार असल्याच ही वृत्तात म्हटले आहे. समोर आलेल्या वृत्तानुसार, एसी, नॉन एसी आणि एक्सप्रेस गाड्यांसाठी ही भाडेवाढ प्रति किलोमीटर 1 पैशाने वाढवली जाईल, तसेच एसीसाठी ही भाडेवाढ प्रति किलोमीटर 2 पैशाने वाढवली जाईल. तसेच रेल्वेच्या उपनगरीय तिकिटांमध्ये कोणत्याही स्वरुपाची भाडेवाढ केली जाणार नाही. तसेच द्वितीय श्रेणीच्या प्रवासासाठी देखील भाडेवाढ केली जाणार नसल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, भारतीय रेल्वेने 1 जुलै 2025 पासून तात्काळ रेल्वे तिकिट बुकिंगसाठी आधार आवश्यक करण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वेच्या अधिकृत सूचनेत म्हटले आहे की 1 जुलै 2025 पासून तात्काळ योजनेअंतर्गत तिकिटे फक्त आधार प्रमाणित वापरकर्त्यांद्वारेच बुक केली जाऊ शकतात.

## शक्तिपीठ महामार्गाकरीता 20 हजार कोटींची तरतूद



**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची एक महत्त्वाची बैठक मंत्रालयात झाली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गानंतर आता शक्तिपीठ महामार्ग करण्यावर राज्य सरकारने भर दिला आहे. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्गाबाबत स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली होती. परंतु, अनेक ठिकाणी शक्तिपीठ महामार्गाला विरोध होताना दिसत आहे. यातच शक्तिपीठ महामार्गाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. तसेच महाराष्ट्रातील वस्तु व सेवा कर यामध्ये काही बदल केले जाणार आहेत. राज्यातील 18 तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गास अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा विरोध असतानाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे आता ज्या भागातून या महामार्गाला विरोध करण्यात येत आहे, तेथील शेतकरी काय भूमिका घेतात, याकडे राज्याचे तसेच राजकीय वर्तुळाचे लक्ष लागलेले आहे. यातच महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, 2017 मध्ये सुधारणा केली जाणार आहे. याबाबतही राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या 2 हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा, त्यापोटीचे हमी शुल्क माफ करण्याचा निर्णय. यात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्य पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीचे 822 कोटी 22 लाख, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिःसारण प्रकल्पासाठी 268 कोटी 84 लाख रुपये व मिरा-भाईंदर महापालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीच्या 116 कोटी 28 लाख रुपयांच्या मागणीचा समावेश.

## अरविंद केजरीवाल राज्यसभेत जाणार?



**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला पंजाबमध्ये मोठा दिलासा मिळाला. लुधियाना पश्चिम विधानसभा पोटनिवडणुकीत 'आप'चे उमेदवार संजीव अरोरा यांनी दणदणीत विजय मिळविला. त्यांनी काँग्रेसचे उमेदवार भारत भूषण आशू यांचा तब्बल 10 हजार मतांनी पराभव केला. अरोरा हे प्रसिद्ध उद्योजक असून सध्या ते आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदारही आहेत. त्यांनी काँग्रेसचे माजी मंत्री आणि दोन वेळा आमदार राहिलेले भारत भूषण आशू यांचा पराभव केला आहे. भाजपानेही या निवडणुकीत पक्षाचा उमेदवार उतरविला होता, मात्र तो चौथ्या क्रमांकावर फेकला गेला. दरम्यान, अरोरा हे विधानसभेवर निवडून गेल्यानंतर पंजाबमधील राज्यसभेची जागा रिक्त झाली आहे. दिल्लीतील पत्रकार परिषदेत केजरीवाल राज्यसभेवर जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. राज्यसभेत कुणाची वर्णी लावायची हे आमच्या पार्टीने नेतेच ठरवतील, माझी राज्यसभेत जाण्याची मुळीच इच्छा नाही, असे केजरीवाल यांनी सांगितले आहे.

## जिल्हा न्यायालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्राचे व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे अनावरण !!

**नागपूर :** देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते नागपुरातील जिल्हा न्यायालयाच्या नवीन इमारतीत भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रासह संविधान उद्देशिकेचे अनावरण करण्यात येणार आहे. तसेच डिस्ट्रीक बार असोसिएशनतर्फे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात येणार आहे. हा अनावरण कार्यक्रम व भव्य सत्कार सोहळा न्याय मंदिर परिसरात 27 जून रोजी सायंकाळी 6 च्या सुमारास आयोजित करण्यात आला आहे. यावेळी न्यायालय परिसरातील नुकतेच नूतनीकरणासह वातानुकूलित व्यवस्थेसह सुसज्ज करण्यात आलेल्या आयटी लायब्ररीचे उद्घाटनसुद्धा त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. डीबीएचे संपूर्ण पदाधिकारी, सदस्य कार्यक्रमाच्या तयारीला लागले आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांचा 27 जूनला डीबीएतर्फे भव्य सत्कार. यासंदर्भात बोलताना डीबीएचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे यांनी सांगितले की, डीबीएच्या नवीन कार्यकारिणीची निवड 9 डिसेंबर 2022 रोजी झाली. 11 फेब्रुवारी 2023 रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ पार पडला. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. बी. शुक्रे, उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती अतुल चांदुरकर, व जिल्हा न्यायाधीश एम. एस. आझमी उपस्थित होते, हे विशेष.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांचा 27 जूनला डीबीएतर्फे सत्कार



डीबीएच्या नवीन कार्यकारिणीने पदभार स्वीकारताच विकास कार्यासह विविध कार्यक्रमावर भर दिला. या दरम्यान 19 मार्च 2023 ला न्याय मंदिर परिसरातील नवीन इमारतीचे उद्घाटन झाले होते. याच इमारतीत आता भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रासह संविधान उद्देशिकेचे अनावरण होणार आहे. तसेच सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या तयारीकरिता प्रशासनाकडून विशेष सहकार्य मिळत असल्याचे डीबीएचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे, जनरल सेक्रेटरी ॲड. मनीष रणदिवे यांनी बोलताना सांगितले. डीबीएच्या नवीन कार्यकारिणीने दरम्यानच्या काळात विविध कार्यक्रम राबविले. नवोदित वकिलांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन, दरमहा नवोदित वकिलांच्या मार्गदर्शनासाठी विविध विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत आहे. यावेळी मार्गदर्शनाकरिता विधि क्षेत्रातील मान्यवरांसह इतर क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांना निमंत्रित केले जाते. यासह वकिलांसाठी मैदानी खेळासह इनडोअर खेळांचेही आयोजन करण्यात येते. जागतिक महिला दिवस कार्यक्रम घेतला जातो. यावेळी महिला वकिलांचा सत्कार करण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले जयंती, सावित्री फुले जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आदी महापुरुषांची जयंती-पुण्यतिथीचा कार्यक्रम साजरा केला जातो. तसेच वकिलांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचेही डीबीएचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे यांनी सांगितले आहे. यामध्ये फॅमिली कोर्टात आरोग्य तपासणी शिबिर, वकिलांच्या कक्षाच्या सुशोभिकरणावर भर देण्यात आला. खिडक्या व दरवाज्यांना पडदे, टेबलचे नवीनीकरण करण्यात आले. कॅन्टींगच्या नूतनीकरणासह खाद्यानाच्या दर्जात सुधारणा करण्यात आली. ई-लायब्ररीला वातानुकूलीत करण्यात आले. पुस्तकेयुक्त लायब्ररीच्या विकासातही भर घालण्यात आली. 50 वर्ष ज्या वकिलांनी सेवा दिली, अशा 27 वरिष्ठ वकिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच ज्या वकिलांच्या मुला-मुलींनी 10 वी व 12 वीमध्ये गुणवत्ता प्राप्त करीत गुण मिळविले, अशा विद्यार्थ्यांचासुद्धा वेळोवेळी सत्कार करण्यात आला.

## पोटनिवडणुकांचे निकाल भाजपासाठी धोक्याची घंटा?

**नवी दिल्ली :** गुजरातसह चार राज्यांमध्ये घेण्यात आलेल्या पाच विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीचे निकाल आज, सोमवारी जाहीर झाले. यामध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीने दोन जागांवर विजय मिळविला. तर भाजपा, काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसला प्रत्येकी एक जागा जिंकण्यात यश मिळाले. विशेष बाब म्हणजे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा बालेकिल्ला असलेल्या गुजरातमध्ये भाजपाच्या उमेदवाराचा दारुण पराभव झाला. गुजरातमधील विसावदर विधानसभा पोटनिवडणुकीत 'आप'च्या उमेदवाराने भाजपा उमेदवाराचा तब्बल 17 हजार मताधिक्याने पराभव केला. दरम्यान, या पोटनिवडणुकीत कोणकोणत्या मतदारसंघात भाजपाला पराभवाचा धक्का बसला,

## महानगरपालिका निवडणुकांमुळेच हिंदीवरून महायुतीचे एक पाऊल मागे ?



**मुंबई :** आगामी मुंबईसह अन्य महानगरपालिका निवडणुकांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी विषय शिकविण्याचा मुद्दा राजकीय वळण घेऊन प्रचाराचा मुद्दा होऊ शकतो हे लक्षात घेऊनच महायुती सरकारने एक पाऊल मागे घेतल्याचे मानले जात आहे. इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा सक्तीच्या करण्याच्या निर्णयावरून निर्माण झालेल्या वादावर तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधितांशी चर्चा करून निर्णय घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. यानुसार सरकारच्या वतीने सर्व संबंधितांशी चर्चा करण्यात येणार आहे. त्रिभाषा सूत्रावर पुढील सोमवारपासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सरकार भूमिका स्पष्ट करेल, असे सांगण्यात आले. त्रिभाषा सूत्रावर सर्व संबंधितांशी चर्चा करण्याचा तोडगा म्हणजे महायुती सरकारने टाकलेले एक पाऊल मागे असल्याचेच मानले जाते. विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेणार हे शालेय शिक्षणमंत्री दादा भूसे यांनी जाहीर केल्याने सरकार यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून त्रिभाषा सक्तीचा निर्णय मागे घेण्याची शक्यता वर्तविली जाते. हिंदीची सक्ती मागे घेण्यात आली असली तरी त्रिभाषा सूत्र कायम ठेवण्यात आले. तिसरी भाषा सक्ती म्हणजे हिंदी लादण्याचाच हा प्रयत्न असल्याची टीका सुरू झाली होती. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी हिंदी शिकविण्यास ठाम विरोध केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही हिंदीला विरोध असल्याचे जाहीर केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही हिंदीवरून सरकारवर टीका केली होती. एकूणच त्रिभाषेवरून राजकीय विरोध वाढला आहे.



बहुजन सौरभ संपादकीय

# आणीबाणीमुळे लोकशाहीचे महत्व अधोरेखित

आज 25 जून, भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज 50 वर्ष पूर्ण झाली. बरोबर 50 वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे 25 जून 1975 रोजी देशात आणीबाणी लागू झाली. 25 जून 1975 हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि वादग्रस्त टप्पा मानला जातो. याच दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. ही आणीबाणी 21 महिने (जानेवारी 1977 पर्यंत) चालली. हा काळ अनेक दृष्टीने लोकशाहीसाठी कठीण परीक्षा ठरला. 1975 मध्ये इंदिरा गांधी यांच्या निवडीस विरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयाने निकाल दिला, ज्यात त्यांची निवड बेकायदेशीर ठरवण्यात आली. त्याच वेळी जयप्रकाश नारायण (जेपी) यांचे नेतृत्वाखालील विद्यार्थी आंदोलन, भ्रष्टाचाराविरोधात मोर्चे, आणि सरकारविरोधी लाट वाढत होती. यामुळे अस्थिरता वाढल्याने, 25 जून 1975 रोजी राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांच्या स्वाक्षरीने आणीबाणी लागू झाली, जी भारताच्या संविधानातील अनुच्छेद 352 अंतर्गत घोषित करण्यात आली. 12 जून 1975 रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी 1971 च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल 12 जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी प्रधानमंत्रीपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना प्रधानमंत्री पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी 25 जून 1975 च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या 21 महिन्यांच्या कालावधीत 11 लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून 1977 साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे प्रधानमंत्री बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा प्रधानमंत्री बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. 49 वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय. आणीबाणीचा लोकशाहीवरील परिणाम, मौलिक हक्क निलंबित करण्यात आले. माध्यमांवर सेन्सॉरशिप लादली गेली. विरोधी नेत्यांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले. निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. संपूर्ण देशात भीतीचे वातावरण होते. या काळात लोकशाहीचे स्तंभ – माध्यमं, न्यायपालिका, संसद, आणि जनता – यांची कसोटी लागली. परंतु, 1977 मध्ये निवडणुका झाल्यावर काँग्रेसचा पराभव झाला आणि जनता पार्टी सत्तेत आली. हे स्पष्ट दाखवते की भारतातील लोकशाहीचीमुळे खोलवर रुजलेली आहेत. या दिवसाची शिकवणः लोकशाहीची सतत निगराणी आवश्यक आहे. स्वातंत्र्य आणि अधिकार हे सहज मिळणारे नसून संरक्षण आवश्यक आहे. लोकांनी प्रश्न विचारणे, सत्तेवर नियंत्रण ठेवणे हे अत्यावश्यक आहे. 25 जून फक्त एक ऐतिहासिक तारीख नसून, ती भारतीय लोकशाहीच्या संघर्षाची आणि विजयानंतर आत्मपरीक्षणाची आठवण आहे. नागरिकांनी यापासून बोध घ्यावा आणि स्वातंत्र्य टिकवण्यासाठी सजग राहावं, हीच आजच्या दिवसाची खरी प्रेरणा आहे. ■ ■

# जागतिक क्षितिजावर भारताच्या
## न्यायपालिकेचा गौरव सरन्यायाधीश भूषण गवई

**आज 25 जून अमरावती येथे वकील संघाच्या वतीने अमरावतीचे सुपुत्र व देशाचे सरन्यायाधीश मा. श्री. भूषण गवई यांच्या अमरावती येथे प्रथम आगमन प्रसंगी भव्य सत्काराचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. हा सत्कार सोहळा अमरावतीच्या कठोरा रोडवरील पोटे इंजिनिअरिंग कॉलेजच्या स्वामी विवेकानंद या भव्य सभागृहात सायंकाळी 6 वाजता संपन्न होत आहे. ते भारताचे सरन्यायाधीश या सर्वोच्च पदी विराजमान झाल्यानंतर काही दिवसातच बाहेर देशात अभ्यास दौऱ्यासाठी गेले होते. न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांनी आपल्या दौऱ्यात भारतीय लोकशाहीतील जो मजबूत न्यायपालिका स्तंभ आहे त्याबद्दलचे महत्व संपूर्ण जगाला पटवून दिले. त्याबद्दलचा संक्षिप्त आढावा मी या लेखात घेतला आहे.**

अलीकडेच युके मधील लंडन येथे ब्रिटिश इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल अँड कंप्यारेटिव्ह लॉ (BIICL) आणि 39 ऐसेक्स चेम्बर्स यांच्या निमंत्रणावरून 4 जून 2025 रोजी भारताचे सरन्यायाधीश श्री. भूषण गवई यांना व्याख्यानासाठी बोलविण्यात आले होते. व्याख्यानाचा विषय होता "The Roll of Courts in upholding Rule of law in Adjudicating Commercial Disputes" म्हणजे व्यवसाय विषयक वादामध्ये न्याय व कायदा कायम राखण्यात त्याचा अंमल करण्यात न्यायालयांची भूमिका कशी असावी या विचार प्रवर्तक विषयावर व्याख्यान देऊन उपस्थित सर्व कायदेपंडीताना मंत्रमुग्ध केले.

या व्याख्यानात त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत मूल्यांचा जागतिक स्तरावर ठामपणे उल्लेख करीत भारतीय न्यायसंस्थेची ऐतिहासिक आणि तात्त्विक बैठक जगासमोर मांडली.



न्यायाधीश भूषण गवई यांनी आपल्या व्याख्यानात भारतीय समाजव्यवस्थेतील दुर्बल आणि उपेक्षित घटकांचे न्यायहक्क अबाधित राहावेत यासाठी भारतीय संविधानाने दिलेले योगदान किती मोठे आहे, हे स्पष्ट केले. गेल्या 75 वर्षांत न्यायसंस्थेच्या माध्यमातून समाजात समतेची जाणीव निर्माण झाली आणि भारतीय न्यायव्यवस्थेतील स्वातंत्र्य, न्याय, बंधुता आणि समानता या चार प्रमुख मूल्यांचा विस्तारपूर्वक ऊहापोह केला.

विशेषतः त्यांनी भारतीय न्याय परंपरेचा इतिहास सांगताना कौटिल्याच्या अर्थशास्त्रात उल्लेखलेली राजधर्म व नीतिनियम प्रणाली, तसेच सम्राट अशोकाच्या कालखंडातील न्यायशास्त्राची मानवी मूल्यांवर आधारित रचना, यांचा आदरपूर्वक उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, भारतात हजारो वर्षांपूर्वीपासून न्याय, नैतिकता आणि मानवतेच्या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून शासकीय व सामाजिक रचना केली जात होती. अशोकाच्या 'धम्म' धोरणात दया, क्षमा, संयम आणि प्रजाजनांसाठी न्याय या गोष्टी मुख्य होत्या. आजच्या न्यायसंस्थेनेही त्या परंपरेचीच आधुनिक पुनरावृत्ती केली पाहिजे, असे त्यांना वाटते. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी भारतीय न्यायसंस्थेचा सर्वसामान्य जनतेशी असलेला दृढ संबंध अधोरेखित करीत सांगितले की, राज्यघटनेच्या अनुच्छेद 14, 19, 21 आणि 32 ही कलमे प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार प्रदान करतात. न्यायालये कोणत्याही राजकीय दबावाशिवाय स्वतंत्रपणे काम करतात, हे स्पष्ट करताना त्यांनी अलीकडे भारतात काही राज्यांमध्ये दिसून येणाऱ्या 'बुलडोझर न्यायपद्धती'वरही स्पष्ट टीका केली. कोणत्याही व्यक्तीवर खटला न भरता थेट शिक्षा देणे म्हणजेच 'बुलडोझर न्याय' असून हे न्यायव्यवस्थेतील मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. "Directions in the matter of demolition of structures" या प्रकरणाचा संदर्भ देत त्यांनी स्पष्ट केले की, न्यायालयाच्या स्पष्ट परवानगीशिवाय कोणतीही इमारत पाडण्याची कारवाई केली जाणे चुकीचे आहे. आरोपी दोषी जरी आढळला, तरी त्याला कायद्यानुसारच शिक्षा दिली गेली पाहिजे, असे त्यांनी यावेळी नमूद केले. I दौऱ्यादरम्यान त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा न्यायप्रक्रियेत वापर, त्याचे फायदे आणि मर्यादा यावरही विचार मांडले. त्यांच्या मते, भविष्यात AI च्या मदतीने खटल्यांची गती वाढवता येईल, मात्र न्यायाधीशांची विवेकबुद्धी व मानवी संवेदनशीलता ही न्यायदानासाठी अपरिहार्य राहील. त्यांनी डिजिटल इंडिया उपक्रम आणि न्यायप्रणाली यांच्यातील तांत्रिक संबंधावरही प्रकाश टाकला. 29 मे 2025 रोजी दिलेल्या भाषणात न्यायसंस्थेवरचा वाढता ताण, प्रलंबित खटल्यांची संख्या आणि न्यायप्रक्रियेतील विलंबाबाबत चिंता व्यक्त केली.



रवींद्र दांडगे
मो. 9404545238

न्यायमूर्ती भूषण गवई यांनी भारतातील नागालँड, मणिपूर, आसाम, अमृतसर आणि झारखंडमधील देवघर अशा ठिकाणी भेटी देऊन स्थानिक न्यायसंस्थांशी संवाद साधला. त्यांनी सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या भागांतील न्यायप्रवेशाचे वास्तव जाणून घेतले आणि असा मुद्दा मांडला की संविधानात दिलेले हक्क केवळ कागदावरच न राहता ते खऱ्या अर्थाने सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले पाहिजेत. हे घडविण्यासाठी प्रशासन, पोलीस आणि न्यायसंस्था यांच्यात समन्वय आवश्यक आहे.

न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांनी आपले मत ठामपणे मांडले की, कायद्याच्या राज्यात कोणत्याही व्यक्तीवर मनमानी कारवाई करण्याऐवजी त्याला न्यायाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे, हेच लोकशाहीचे खरे स्वरूप आहे. आजही भारतातील सुमारे 70टक्के जनता न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवते आणि हा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी न्यायालयांनी अधिक पारदर्शक, जलद आणि लोकाभिमुख व्हावे, असे त्यांना वाटते. न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांनी न्याय प्रक्रियेतील अलगोरिदमिक बॅलन्स यावर भर दिला. कायद्याचा अलगोरिदम म्हणजे नियमबद्ध निर्णय प्रक्रिया होय. अखेर त्यांच्या भाषणात त्यांनी अधोरेखित केले की लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून, ती न्याय, स्वातंत्र्य, समान संधी आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारलेली असते. भारताचे संविधान हे एक जिवंत दस्तऐवज आहे आणि त्याचे रक्षण करणे हे केवळ न्यायसंस्थेचेच नव्हे, तर या देशातील सर्व जनतेची सामूहिक जबाबदारी आहे. ■ ■

# तुमच्या अपेक्षा मुलांवर लादू नयेत



असांगली आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावात एक हृदयद्रावक आणि धक्कादायक घटना घडली आहे. बारावीत शिकणाऱ्या साधना भोसले या हुशार विद्यार्थिनीला नीटच्या चाचणी परीक्षेत कमी गुण मिळाल्याच्या रागातून तिच्या वडिलांनी लाकडी खुंट्याने बेदम मारहाण केली. मारहाण करणारे वडील स्वतः खाजगी माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक आहेत. या मारहाणीत साधना गंभीर जखमी झाली आणि अखेर तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी साधनाचे वडील धोंडीराम भोसले यांना आटपाडी पोलिसांनी अटक केली आहे. चीड आणणारी ही घटना शुक्रवारी (20 जून 2025) रात्री 9.30 च्या सुमारास घडली. साधना ही विज्ञान शाखेत बारावीत शिकत होती आणि डॉक्टर बनण्याचे तिचे स्वप्न होते. दहावीच्या परीक्षेत तिने 95 टक्के गुण मिळवले होते, पण नीटच्या चाचणी परीक्षेत कमी गुण मिळाल्याने तिचे वडील धोंडीराम भोसले संतापले. 'परीक्षेत कमी गुण कसे पडले?' असे विचारत त्यांनी रागाच्या भरात साधनाला घरातच लाकडी खुंट्याने मारहाण केली. या मारहाणीत साधना गंभीर जखमी झाली. धक्कादायक बाब म्हणजे, मारहाणीनंतर तिला तातडीने रुग्णालयात नेण्याऐवजी धोंडीराम दुसऱ्या दिवशी सकाळी योग दिन साजरा करण्यासाठी शाळेत गेले. घरी परतल्यानंतर त्यांना साधना बेशुद्ध अवस्थेत आढळली. तेव्हा तिला रुग्णालयात दाखल केले, पण उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला.

साधनाची आई प्रीती भोसले यांनी या प्रकरणी आटपाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानंतर रविवारी (22 जून 2025) धोंडीराम भोसले यांना अटक करण्यात आली. साधना ही आटपाडी येथील विद्यालयात राहत होती आणि दोन दिवसांपूर्वीच ती घरी आली होती. तिच्या हुशारी आणि डॉक्टर बनण्याच्या स्वप्नाबद्दल गावात चर्चा होती, पण फक्त एका चाचणी परीक्षेतील कमी गुणांमुळे तिचा हकनाक बळी गेला. दरम्यान, या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, शैक्षणिक दबाव आणि पालकांच्या अवास्तव अपेक्षांवरून पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे. या संदर्भात काही मुद्दे विचारात घ्यावे लागतील.

पालकांकडे पैसे आहेत म्हणून नीट किंवा जेईईसारख्या परीक्षांच्या तयारीसाठी शिकवणी लावली जाते. दहावीत मिळालेले भरमसाट मार्क्स अकरावी-बारावी विज्ञान आणि त्यापुढील प्रवेश परीक्षेत फारसे कामाला येत नाहीत. आपल्या मुलांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किंवा आयआयटीमध्ये जाण्याचे स्वप्ने उराशी बाळगलेली असतात. पालक आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा आकांक्षा मुलांकडून पूर्ण करून घेण्याच्या उद्देशाने महागडे क्लास लावतात. पैसे खर्च केले तर मार्क्स मिळायला हवे असा पालकांचा आग्रह असतो. अनेक मुलांना गुंतागुंतीचे किचकट प्रश्न सोडवता येत नाहीत. संकल्पना स्पष्ट नसतात. शिकवलेले, समजलेले नसले तरी परीक्षा कठोर वातावरणात होतात. अशा वेळी मुलांच्या नाकीनऊ येतात. तीव्र स्पर्धा असते. आई-बाबांनी पैसे खर्च केलेले आहेत. अपेक्षित मार्क्स मिळत नाहीयेत. आई-वडिलांना मार्क्स पाहिजेत. अभ्यासात मन लागत नाही. तीव्र चिंता सतावत असते. मनात भीती घर करून बसलेली असते. आतल्या आत प्रचंड खळबळ सुरू असते. रेसच्या घोड्यावर लावतात तसे पालकांनी मुलांवर पैसे लावलेले असतात! त्यांना केवळ यश हवे असते!

परिणामी मुले त्रासात व तणावात जातात. त्यांची विचित्र कोंडी होते. सांगता येत नाही आणि सहनही होत नाही. अशी मनोवस्था मुले अनुभवत असतात... पालकांना मुलांच्या अंतरंगातला कल्लोळ आणि त्रास यांचा अंदाज येत नाही. निमूटपणे सहन करण्याशिवाय मुलांपुढे अन्य पर्याय नसतो. आतली खळबळ न सांगता. अनेकदा या मानसिक ताणतणावातून मुले नैराश्याच्या फेऱ्यात सापडतात.

भगवान बुद्धांची शिकवण



आर. के. जुमळे
93264 50506

जेईई, नीट या पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले तरच आपल्या मुलांना उज्ज्वल भविष्य आहे असे बहुसंख्य पालकांना वाटू लागते. यातूनच तुलना केली जाते. ताण असह्य होऊन किंवा कथित अपयशाची भीती वाटल्याने, मनावर प्रचंड दडपण आल्यामुळे 'आई बाबा मला माफ करा...' अशी नोट लिहून मुले आत्महत्या केल्याचे बातम्या येतात.

खलिल जिब्रान म्हणतो, 'तुमची मुले तुमच्या पोटी जन्माला आलेली असली तरी ती काळ प्रवाहाची अपत्ये आहेत. तुमचे विचार तुमच्या अपेक्षा मुलांवर लादू नयेत.' हाच बोध या घटनेवरून घेता येईल. ■ ■



हा जो पुस्तकांचा डोंगर दिसतोय ना, तो शरद पाटील उर्फ शपा या माणसाने एकोणसत्तर वर्ष रक्ताची शाई करुन उभारला आहे. तो ही हाती कोणतीही डिग्री नसतांना! आजकाल रेल्वे स्टेशन असो, बस स्टँण्ड असो, वा इतर सार्वजनिक ठिकाणे असोत तेथे अमुक अमुक यांनी एवढ्या-इतक्या डिग्र्या घेतल्या असे उंच उंच फ्लेक्स लाऊन प्रदर्शन केले जाते आणि येथे प्रचंड लिखाण करुनही त्याची दखल कोणी फारशी घ्यायला तयार नाही. शपांनी त्या एकोणसत्तर वर्षात किती तरी महिने, काही वर्ष तुरुंगात काढलीत, किती तरी दिवस आंदोलनात, मोर्चात, लाँग मार्च मध्ये गेलीत. किती तरी महिने आदिवासींची चळवळ बांधण्यात गेलीत, शेकडो दिवस महाराष्ट्रभर व भारतभर व्याख्याने, चर्चासत्र, परिसंवादात गेलीत. हे सर्व ग्राउंड वर्क करताना हजारो ग्रंथाच्या वाचनात शेकडो दिवस गेलीत. शपा हे नुसते टेबलावर बसून लिहिणारे एकेडेमिशियन नव्हते, तर प्रचंड मोठे फिल्ड वर्कर होते. हे सर्व असूनही त्यांनी हा भला मोठा पुस्तकांचा माउंट ऐव्हरेस्ट पर्वत एकट्याने, एक लेखणीच्या साहाय्याने सर केला आहे. हे सर्व पर्वतमय लेखन आणि फिल्डवर्क उभारत असतांना शपा कुटुंबातील माणसात किती वावरले असतील? किती मिसळले असतील? हा माझ्या मनाला पडलेला स्वाभाविक प्रश्न आहे.. सुशिलाताईंना शपांनी किती वेळ, प्रेम दिले असेल? घरातला कर्ता पुरुष म्हणून शपांनी किती जबाबदाऱ्या उचलल्या असतील?



राजाराम सूर्यवंशी
मो. 9503867602

# शपांचे डोंगराऐवढे लिखाण !

सुशिलाताईंना हिंडने-फिरणे, चार-चौघात मिसळणे कधी जमले असेल का? त्याशिवाय त्यांच्या मुलांना त्यांचे 'आप्पा' म्हणून कधी भेटले असतील का? शपांचे पतीचे व पित्याचे मन; पत्नीची ससेहोलपट व मुलांची कोमजलेली मने पाहून कितीदा आतल्या आत गहिवरले असेल? आयुष्यात असे कितीदा शपांनी स्वतःला गिल्टी समजले असेल? अशावेळी ते स्वतःच्या मनाची समजूत कशी काढत असतील? हा असा धिप्पाड गृहस्थ पित्याच्या निधनाच्या वेळी उकाई धरणग्रस्थांच्या प्रश्न सोडवण्यात व्यस्त होते; तर, मातेच्या निधनाच्यावेळी मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाच्या कारणाने तुरुंगात बंदिस्त होते! अशा वेळी त्यांच्या मनाने कितीदा आतल्यात आक्रोश केला असेल? शपांच्या सर्वस्तरीय विरोधकांना शपांचे हे 'आक्रोशीत मन' कधीच दिसले नसेल का? तेही जाऊ द्या, ज्यांना शरद पाटीलांचे लिखाण कळ्ले नाही, जे शरद पाटलांना अनुल्लेखाने मारत होते, जे शपांचा दुस्वास करत होते, त्या सर्वांनी शपांचा व्यासंग, त्याग, वैचारिक निष्ठा यांचा कधी अभ्यास केला होता का? शपांचे निष्कर्ष चुकत असतील, परंतु जे शपांना चुकीचे ठरवत होते, त्यांनी शपांची निंदा करण्यापलिकडे कोणती वैचारिक मांडणी केली होती? खरे वास्तव हे होते की, शपा या सर्वांपलिकडे होते आणि त्यांचे विरोधक? द्रोणागिरी पर्वताभोवती प्रदक्षिणा घालत होते. ते द्रोणागिरीच्या पायथ्याशीही पोहचू शकत नव्हते. शपा त्यांच्यासाठी महानुभव पंथातील लिळाचरित्राच्या कथेसारखे झाले होते! जातिव्यवस्थेने शपांच्या पांडित्याला खुरगटून टाकले आहे आणि त्या खुरटण्याला शपांचे तथाकथित विरोधक आणि तथाकथित शिष्यांनी खतपाणी घालण्याचे पातक केले होते हेच सत्य आहे! ■ ■

# बुद्धाचे व्यक्तित्व देखनेच होते...



**सर्वत्र प्राप्त वर्णनावरून असा बोध होतो की, तथागत सर्वांग सुंदर असे देखणे व्यक्तिमत्व होते. त्यांची कायाकृती सुवर्णगिरी शिखरासम होती. त्यांचा बांधा उंच आणि सदृढ होता. त्यांचे दृश्य व्यक्तित्व आकर्षक होते. त्यांचे आजानुबाहू, त्यांची सिंहकटी, त्यांचे ऋषभासम नेत्र, त्यांची सुवर्णकांती, त्यांचे भरदार रुंद वक्ष सर्वांना आकर्षित करीत असे.**

त्यांची भूकुटी, त्यांचा भाल प्रदेश, त्यांचे मुखमंडल, त्यांचे नेत्र, त्यांची काया, त्यांचे बाहू, त्यांचे पाद, त्यांची गती, त्यांच्या देहाच्या कोणत्याही अंगावर कोणाचीही दृष्टी पडो, ती दृष्टी तेथेच खिळून राहत असे. जो कोणी त्यांना पाहत असे त्याच्यावर त्यांची तेजस्विता, त्यांचे सामर्थ्य, त्यांचे अनुपम सौंदर्य यांचा प्रभाव पडत असे, त्यांचे दर्शन झाल्यावर अन्यत्र जाणारा तेथेच खेळून राही. कोणी उभा असेल तर त्याच्या पाठोपाठ चालू लागे, कोणी शांतपणे मंदगतीने जात असेल तर द्रूतगतीने चालू लागे आणि कोणी बसलेला असेल तर त्वरित उठून उभा राही. जे कोणी त्यांच्या दर्शनार्थ येत, त्यापैकी काही त्यांना हात जोडून अभिवादन करीत. काही आदराने नतमस्तक होत. काही स्नेहासिक्त स्वरांनी त्यांना संबोधित. आदर व्यक्त केल्याशिवाय कोणीही त्यांचा निरोप घेत नसे. ते सर्वांचे प्रिय पात्र होते. ते सर्वांच्या आदरास पात्र होते. स्त्री आणि पुरुष सर्व त्यांची वाणी ऐकण्यास उत्सुक असत. त्यांची वाणी असाधारण मधुर होती. त्यांची वाणी गंभीर आकर्षक, कंपनयुक्त आणि सुस्पष्ट होती. त्यांची वाणी दिव्य संगीताची प्रचिती देत असे. त्यांची वाणी श्रवण करणारास आश्वस्थ करीत असे.

त्यांचे रूप पाहणाऱ्यांना प्रेरक ठरत असे. त्यांचे व्यक्तित्व त्यांना लोकनेता होण्यासच नव्हे तर त्यांच्या अनुयायांची हृदयगती होण्यासही संपन्न होते. जेव्हा ते बोलत असत तेव्हा श्रोते सहज एकत्र होत असत. ते काय बोलतात, त्याला विशेष महत्त्व नव्हते. परंतु ते बोलत असत तेव्हा श्रवण करणाऱ्यांच्या भावना हेलावून जात. ते श्रोत्यांची मने सहज जिंकत असत. श्रोत्यांच्या मनावर त्यांच्या वाणीचा एवढा प्रभाव पडत असे की. ते जे काही सांगत आहेत ते केवळ सत्यच नव्हे, तर तोच एकमेव त्यांच्या मुक्तीचा मार्ग आहे असा त्यांचा विश्वास असे. त्यांची वाणी श्रवण करणारांना, त्यांच्या वाणीत दासांना मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे याची जाणीव होत असे. जेव्हा ते स्त्री-पुरुषाबरोबर संवाद करीत असत तेव्हा त्यांचे शांत, धीरगंभीर रूप लोकांच्या मनात आदराची भावना निर्माण करीत असे. त्यांची मधुर वाणी लोकांना आश्चर्यचकित आणि हर्षविभोर करीत असे. दरोडेखोर अंगुलीमाल यास आणि आळवीच्या नरमास भक्षकास दुसरा कोण धम्माची दीक्षा देऊ शकला असता? राजा प्रनसेजित आणि राणी मल्लिका यांच्यात एका शब्दाने सख्खे घडून आणणे कोणाला शक्य होते? एकदा त्यांच्याने प्रभावित झालेली व्यक्ती त्यांची कायमची अंकित होत असे. असे त्यांचे व्यक्तित्व आकर्षक होते.

तथागतांची सत्य गाथा



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

'प्रत्यक्ष पाहणाऱ्यांची साक्ष. परंपरागत मान्यतांचे समर्थन ज्यांनी तथागतांना त्यांच्या जीवनकाळात पाहिले. त्या लोकांच्या साक्षीनेही होते. किंवा ज्यांनी त्यांची भेट घेतली त्यांच्या साक्षीनेही होते. एक असा प्रत्यक्ष साक्षी म्हणजे साल नावाचा ब्राम्हण होय. तथागतांना प्रत्यक्ष पाहिल्यावर त्याने तथागतांची प्रशंसा करताना आपल्या भावना या शब्दात व्यक्त केल्या. तथागतांसमक्ष आल्यावर तो ब्राम्हण तथागतांना अभिवादन करता झाला. तो तथागता निकट बसला. त्याने तथागताचे कुशलक्षम विचारले. त्यावेळी महापुरुषाची 32 लक्षणे तथागताठाई आहेत अथवा नाही हे जाणून घेण्यासाठी त्याने तथागतांची काया निरीक्षिली आणि निरीक्षणांती त्याला तथागतांठाई ती 32 लक्षणे आढळलीही. महापुरुषाच्या 32 लक्षणाविषयी खात्री पटल्यावर तथागतांना संबोधी प्राप्त झाली अथवा नाही. याविषयी मात्र त्याच्या मनात संदेश होता. वय वृद्ध ब्राम्हण, आचार्य, प्राचार्य, यांच्याकडून त्याने असे ऐकले होते की, जे अर्हत आहेत, सम्यक संबुद्ध आहेत त्याची स्तुती केल्याने ते प्रगट होतात. याचे त्याला स्मरण झाले. म्हणून त्याने या शब्दांनी तथागताची स्तुती करण्याचे योजिले.

'तथागता, आपली काया निर्दोष आहे, परिपूर्ण आहे, श्रेष्ठतम आहे, आकर्षक आहे, आपली कांती सुवर्णवर्णी आहे, दंतपंक्ती शुभ्र आहे. महापुरुषाच्या ठाई असणारे प्रत्येक लक्षण या सुविकसित कायेत प्रतीत होते. सुस्पष्ट दृष्टी आणि सुंदर, उंच, सरळ देहयष्टी यामुळे आपण आपल्या अनुयायांत रवीसम प्रकाशमान आहात. आपण सुशील आहात. सुवर्णवर्णी आहात तरीही आपण आपले तारुण्य अनागरिक श्रमण होऊन व्यर्थ का व्यतीत करीत आहात?' 'आपण चक्रवर्ती नरेशच व्हावयास पाहिजे. आपली राज्यसत्ता सातासमुद्रा पलीकडे असावयास पाहिजे. अभिमानी राजांनी आपल्या सन्मुख ग्राम प्रमुखासम नतमस्तक व्हावयास पाहिजे. आपण समस्त विश्वाचे चक्रवर्ती सम्राट व्हावयास पाहिजे.' आनंदाने वर्णन केल्याप्रमाणे तथागतांची देहकांती इतकी निर्मल आणि तेजपुंज होती की, त्यावर सुवर्ण वर्णी वस्त्रांची जोडी ठेवल्या बरोबर क्षणार्धात ती सुद्धा ज्योती हरवल्यागत मलान वाटत असे. त्यांचे विरोधक तथागतांना मोहिनी सौंदर्याचे प्रतिरूप म्हणत असत यात आश्चर्य काय? ■ ■

# डॉ. बाबासाहेबांनी महाविद्यालयाला मिलिंद हेच नाव का दिले?

या कॉलेजला 'मिलिंद' हे नाव देण्याचा माझा उद्देश आहे. मिलिंद हा एक बॅक्ट्रीयाचा ग्रीक राजा होता. त्याला आपल्या विद्वत्तेबद्दल घमंड होती. त्याला असे वाटे की, ग्रीक सारखे विद्वान लोक जगाच्या पाठीवर कोठेच सापडावयाचे नाहीत. आपल्या बुद्धिमत्तेचा मिलिंदला गर्व चढला होता. तो सर्वांना वादविवादाने आव्हान देत असे. त्याने जगाला आव्हान दिले. त्याला एकदा वाटले की, आपण एखाद्या बौद्धभिक्खू बरोबर वाद करावा. पण त्याच्याबरोबर वाद करावयास कोणीही तयार झाला नाही. तसे मिलिंद हा काही तत्वज्ञानी नव्हता किंवा गाढा विद्वानही नव्हता. त्याला राज्यकारभार कसा चालवावा हेच माहित होते, पण अशा मिलिंद बरोबर बुद्धिवाद करण्यास कोणीही तयार होईना. याची बौद्धांना लाज वाटली आणि वाईटही वाटले. नंतर महान प्रयासाने त्यांनी नागसेन भिक्खूला तयार केले. मिलिंदचे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे असा नागसेनाने निश्चय केला. मग त्यात यश येईल किंवा अपयश. नागसेन, त्याच्या वयाच्या सातव्या वर्षी त्याने आपल्या आई-बापाचे घर सोडले होते. त्याने विद्येच्या, ज्ञानाच्या प्राप्तीसाठी अतिशय कष्ट घेतले. तो अत्यंत विद्वान होता. नागसेनाने भिक्खुचा आग्रह मान्य केला, नंतर मिलिंद व नागसेन यांचा वादविवाद झाला. त्यांचा वादविवाद कैक दिवस चालू होता. या वादविवादाचे एक पुस्तक तयार झाले. त्या पुस्तकाला पाली भाषेत 'मिलिंद पन्हो' असे नाव आहे. या पुस्तकाचे मराठीत भाषांतर 'मिलिंद प्रश्न' असे आहे. या पुस्तकाचे शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अवश्य वाचन करावे अशी माझी इच्छा आहे. शिक्षकांच्या अंगी व विद्यार्थ्यांच्या अंगी काय गुण असावेत हे त्यात सांगितले आहे. म्हणून मी या कॉलेजला 'मिलिंद महाविद्यालय' हे नाव दिले व परिसराला 'नागसेनवन' हे नाव दिले. वादविवादात मिलिंद हरला, त्याचा पराजय झाला. तो बुद्धधर्मी झाला. पण मिलिंद हरला व बुद्ध धर्मी झाला म्हणून मी हे नाव दिलेले नाही तर मिलिंद हा मला त्याच्या Intellectual Honesty बद्दल प्रिय वाटतो. त्याचा हा आदर्श सर्वांनी नेहमी डोळ्यांसमोर ठेवावा म्हणून मी हे नाव दिलेले आहे. हे आदर्शभूत असेच आहे असे माझे मत आहे. उत्तम विद्यार्थी म्हणून मिलिंद व उत्तम शिक्षक म्हणून नागसेन हे आदर्श आहेत. शिक्षण संस्थेला एखाद्या श्रीमंत व्यापाऱ्याने केवळ पैशांची देणगी दिली म्हणून त्याचे नाव शिक्षण संस्थेला देणे हे अनुचित होय. मी या संस्थेसाठी पुष्कळ नुकसान सोसले आहे, पण कोण्या व्यक्तीचे नाव दिले नाही. तसे मला सुद्धा आदर्श नाव आहे. पण मला मिलिंदचा आदर्श आपल्या समोर ठेवावयाचा आहे. मिलिंद महाविद्यालय एक संस्कारकेंद्र आहे, यामधून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी सुसंस्कृत होऊन बाहेर पडला पाहिजे.'



■ ■ - विजया कांबळे

“ विचारांची खोली ही खऱ्या बुद्धिमत्तेची ओळख आहे. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# जेव्हा तुमच्या घरी दिवा लागतो, तेव्हा कोणाचा तरी जीव पणाला लागतो !

*आपण घरात सुरक्षित बसलेलो असतो. बाहेर मुसळधार पाऊस कोसळत असतो, सोसाट्याचा वारा सुटलेला असतो किंवा कडक ऊन अक्षरशः अंगाची लाही लाही करत असते. आपण आपल्या घराचे दरवाजे, खिडक्या बंद करून निवांत असतो. पण याच वेळी, काही माणसे आपल्या घराचे दरवाजे उघडून, आपल्या आयुष्याची लढाई लढायला बाहेर पडत असतात. ते असतात आपले लाइनमन, खरे प्रकाश योद्धा!*

अंधार होताच सुरू होते त्यांची अग्निपरीक्षा. वीज गेली की आपल्यापैकी अनेकांना लगेच राग येतो, चिडचिड होते. ‘अरे देवा! पुन्हा लाईट गेली? कधी येणार आता?’ असे उद्गार आपल्या तोंडातून आपोआप बाहेर पडतात. पण तुम्हाला माहीत आहे का, याच एका क्षणी शेकडो घरांमध्ये धाकधूक सुरू होते? नियंत्रण कक्षातून फोन येतो, ‘लाईन चालू करा!’ आणि मग जराही वेळ न घालवता तो कर्मचारी वादळ, पाऊस किंवा भर उन्हात आपल्या कामावर निघतो. तो हे विसरून जातो की, तो कोणाचा तरी प्रेमळ बाप आहे, कोणाचा तरी आधारवड मुलगा आहे किंवा कोणाचा तरी काळजीवाहू पती आहे. त्याच्या कुटुंबीयांचे डोळे त्याच्या वाटेकडे लागलेले असतात. मुले देवाजवळ आपल्या बाबांच्या सुखरूप परत येण्यासाठी प्रार्थना करतात, तर पत्नी देवघरात दिवा लावून ‘माझ्या माणसाला काही होऊ नये’ अशी आळवणी करते. प्रत्येक वादळात, प्रत्येक पावसात, प्रत्येक बिघाडात या वीज कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढतच राहते. एका मुलीची हृदयस्पर्शी विनंती...

काही दिवसांपूर्वी एका लाइनमनच्या मुलीने सोशल मीडियावर एक अत्यंत हृदयस्पर्शी आवाहन केले होते, ‘कृपया... वीज गेली तर रागवू नका, ओरडू नका... आमचे बाबा, काका, भाऊ त्याच लाईनवर काम करत असतात. एक छोटीशी चूक त्यांचा जीव घेऊ शकते. त्यांचे कुटुंबीय त्यांची सुखरूप परत येण्याची वाट पाहत असतात.’ हे वाक्य ऐकल्यावर आपल्या काळजाला हात लागतो, नाही का? तिच्या 12 वर्षांच्या स्वर्णा नावाच्या मैत्रिणीचे डोळे भीती दाखवतात, जेव्हा ती सांगते, ‘बाबा आत्ताच शेताजवळच्या ट्रान्सफॉर्मरवर गेले आहेत.’ तिची आई दर पाच मिनिटांनी फोन तपासते, ‘फोन बंद तर नाही झाला? विजेचा धक्का तर




नाही लागला?’ ही चिंता अनाठायी नाही. दरवर्षी आपल्याकडे अनेक लाइनमन ड्युटीवर असताना विजेचा धक्का लागून किंवा उंचीवरून पडून आपला जीव गमावतात किंवा जायबंदी होतात. जीवाची बाजी लावून कर्तव्य बजावणारे हात वीज विभागातील एक कर्मचारी सांगतो की, ‘सामान्य जनतेला फक्त वीज गेल्याचे दिसते, पण वीज परत आणण्यासाठी आमचे सहकारी आपला जीव धोक्यात घालून काम करतात. अनेकदा ओले खांब, तुटलेल्या तारा किंवा पडलेली झाडेही धोकादायक ठरतात. तरीही लाईन सुरू होईपर्यंत हे लोक घरी परत येत नाहीत.’ प्रदिप यांची पत्नी सांगते, ‘जेव्हाही बाहेर हवामान खराब असते, तेव्हा मी देवघरात दिवा लावते. देवाकडे प्रार्थना करते की माझ्या माणसाला काही होऊ नये. जर फोन बराच वेळ वाजला नाही, तर माझी अस्वस्थता अजून वाढते.’ ज्येष्ठ लाइनमन सुजित म्हणतात, ‘पावसात सर्वात जास्त धोका असतो. वीजेचा करंट जमिनीत पसरू शकतो. खांब निसरडे होतात. वरून नियंत्रण कक्षाचा दबाव असतो की ‘लाईन चालू करा’. पण आम्ही किती धोका पत्करून काम करत आहोत, हे लोकांना माहीत नसते.’ पुढच्या वेळी वीज गेली तर... आपल्यासाठी वीज म्हणजे फक्त एक बटण दाबणे. पण या एका सोप्या क्रियेमागे एक संपूर्ण आयुष्य पणाला लागलेले असते. वादळात तुटलेल्या तारा जोडणे, ओल्या ट्रान्सफॉर्मरवर चढणे, खड्ड्यांमध्ये उभे राहून खांब धरणे, डोक्यापर्यंतच्या पाण्यात पोहूण जाणे... हे सर्व मृत्यूच्या जबड्यात उतरण्यासारखे आहे. पण अशा परिस्थितीतही ते आपली भीती गिळून कर्तव्य बजावतात. त्यामुळे, पुढच्या वेळी जेव्हा तुमच्या घरातील दिवा अचानक विझेल, तेव्हा राग करण्यापूर्वी जरा थांबा. विचार करा की कोणीतरी आपले त्या तारांवर काम करत आहे. त्याच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करा. तुमचा थोडासा संयम, त्यांची थोडीशी सुरक्षितता... त्यांच्या कुटुंबासाठी खूप मोठा दिलासा ठरू शकतो. चला, या निःस्वार्थ सेवाभावी प्रकाश योद्ध्यांचा आदर करूया आणि त्यांच्या कामाचे मोल जाणूया. ■■

योगेश विटनकर, नागपूर

# कोण आपले? कोण परके?

**अनंतायन**



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

जर कुणी सोबत रहायला तयार नसेल तर त्याला मुक्त करावे कारण जबरदस्तीने पकडून ठेवलेल्या नात्यांमधून समाधान मिळत नाही. त्यामुळे कधी-कधी गैरसमज निर्माण होतात. बरेचदा गैरसमजातून वाद निर्माण होतात. कच्चे कान, संशयी नजर आणि कमकुवत मनाच्या व्यक्तींना समोरच्या व्यक्तीची योग्य ती पारख करता येत नाही. म्हणूनच अशा व्यक्तींना स्वर्गातही नरकाचे दर्शन होते. ह्या दुनियेत त्या व्यक्तींचा वापर केला जातो ज्या कमकुवत मनाच्या अन् रिकाम्या डोक्याच्या असतात. त्या व्यक्तींना ह्या जोखडातून कधीही मुक्त करता येत नाही कारण ज्या साखळदंडाने त्यांना जखडलेले असते त्या साखळदंवरच त्यांचे प्रेम असते. कधी-कधी एकटे राहण्यातच फायदा असतो कारण आपले म्हणून संपर्कात आलेले लोक आपल्याला खुप यातना देवून जातात. **`ये जताते बहूत थे, मगर निभाना भूल गए। अपना तो कहते रहे, मगर अपनाना भूल गए॥**’ असाही अनुभव अनेकदा येतो. अशा लोकांकडून काही अपेक्षा करणे हे स्वतःची फसगत करून घेण्यासारखे असते. `**कटी हुयी टहनीयॉ कहाँ छाव देती है? हदसे ज्यादा उम्मीद, हमेशा घाव देती है**’ कुणावरही खुप अवलंबून राहणे किंवा नको तेवढा विश्वास टाकल्याने बरेचदा नुकसान सहन करावे लागते. ज्याचेवर विश्वास ठेवतो ती व्यक्ती त्या पात्रतेची आहे की नाही ह्याची पडताळणी करणे आवश्यक असते. कारण `विश्वासा’तही `विषा’चा `वास’ असतो. बरेचजण म्हणतात, माझी भूतकाळाबद्दल कोणतीही तक्रार नाही पण वाईट ह्याचेच वाटते की आपण आपला किमती वेळ चुकीच्या व्यक्तीसाठी वाया घालवला. `पत्तोंने रंग बदला और वे गिर गए, वरना पेड़ को उन्हे संभालने में कोई दिक्कत नहीं थी’ ज्यांना साथ द्यायची नसते ते स्वतःच दुर जातात पण जे होते ते चांगल्यासाठीच होते. कारण पानगळ झाल्याशिवाय नवीन पालवी फुटत नाही. ज्या व्यक्तींना पाठीमागे बोलायची सवय असते त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करावे कारण सावली कितीही लांब असली तरी शरीराची बरोबरी करू शकत नाही. `ना घमंड में रहो, ना गुरूर में रहो बस! जिनसे विचार नहीं मिलते, उनसे दुर रहो’ ज्यांच्या दरवाज्यावर आपली किंमत नाही तो दरवाजा खटखटण्याच्या भानगडीत पडू नये. काही काहींना केवळ दुसऱ्याच्या फक्त चुका अन् दोष दिसतात. इतरांच्या चांगल्या गोष्टींकडे ते जाणीवपूर्वक डोळेझाक करतात. `कैसे खिलेंगे रिश्तों के फुल ? अगर ढुंढते रहो एक-दुसरे की भूल’ जे लोक इतरांच्या दुःखाला समजून घेतात, योग्य ते सहकार्य करतात. अशा व्यक्ती कुणाच्या दुःखाचे कारण बनत नाहीत उलट ते समस्येचे निराकरण करण्यासाठी मदत करतात. ह्याउलट मतलबी माणसे ही पायात घुसलेल्या काट्यांसारखे असतात. जोपर्यंत त्यांना काढून टाकत नाही तोपर्यंत पुढे जाता येत नाही. ह्या व्यक्ती ना स्वतः प्रगती करतात ना इतरांना करू देतात. **`छोटी सोच और पैर की मोच किसीको आगे नहीं बढने देती.`** ह्या लोकांना समुद्र देता यावा म्हणून समोरची व्यक्ती आकाशाएवढे मन मोठे करते पण मतलबी व्यक्ती एका थेंबासाठी बेईमानी करतात. त्यावरून त्यांची लायकी कळते. ह्या व्यक्ती म्हणजे **`खुशी में नजर और दुख में नमक लगाने के काम में माहिर होते है’** संगत त्यांची करावी जे संकटात साथ देतात. कुणी कोसळत असेल तर मदतीचा हात देतात. म्हणूनच आपल्या सुखाच्या प्रसंगात त्यांना आग्रहाचे निमंत्रण द्यावे जे लोक आपल्या दुःखद प्रसंगी न बोलावता आपणहून हजर राहतात. पण कुणी जर कितीही समजावून सांगितले तरी सतत आपल्या मनाविरूध्द वागत असेल तेव्हा त्यांच्या नादी लागु नये. काही काही व्यक्ती ह्या समजण्या पलीकडच्या असतात. थोडक्यात काय तर आपण आपला मार्ग निवडावा. **`अगर समझाने से लोग समझ जाते तो बाँसूरी बजानेवाला कभी महाभारत नहीं होने देता’** योग्य ती सावधगीरी बाळगण्यामुळे पुढील बरेच अनर्थ टाळता येऊ शकतात. **`कभी मकसद, कभी चाल, कभी मंसूबे यार होते है’ ये वो दौर है, जिसमे नमस्कार के मतलब भी हजार होते है’** ह्या सर्व गोष्टी कोणत्याही विद्यापीठात शिकवल्या जात नाहीत. ह्याचे ज्ञान आपल्याला केवळ आपल्या अनूभवातून प्राप्त होते. पुस्तकाशिवाय ज्या गोष्टींचा अभ्यास करावा लागतो त्यालाच जिवन असे म्हणतात. ■■

# दैनिक बहुजन सौरभची वाटचाल...

डॉ. बाबासाहेब म्हणतात, पत्रकारिता हा पैसे कमाविण्याचा धंदा नसून जनजागृती करिता घेतलेली स्वयंदीक्षा आहे. डॉ. बाबासाहेबांची पत्रकारिता म्हणजे मानव मुक्तीचा धगधगता अंगार होती. हजारो वर्षे ज्या अस्पृश्य समाजास धर्मव्यवस्थेने मुक-बधीर बनविले, अशा मुक्यांना वाचा, बधिरांना मती आणि गती देण्याचे कार्य त्यांनी आपल्या पत्रकारितेतून केले. ते म्हणतात, ‘कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते.’ आज आंबेडकरी चळवळीची स्थिती काही वेगळी नाही. नागपुरात बहुजन सौरभ शिवाय दुसरे कोणतेही वृत्तपत्र नाही. पत्रकारितेचे वरील महत्व लक्षात घेऊन कोरोना काळात स्मृतीशेष मिलिंद फुलझेले, डॉ. सिद्धार्थ कांबळे, संध्या राजुरकर, विलास गजभिये, नरेश मेश्राम ई. नी वृत्तपत्र निर्मितीचा संकल्प केला. ‘बहुजन सौरभ’ असे नामकरण झाले. सौरभ म्हणजे सुगंध, वैचारिकतेचा सुगंध! तो आज चारही दिशेला दरवळत आहे, व्याप्ती वाढत आहे. एके काळी आंबेडकरी विचारांची 27 वृत्तपत्रे होती. ती प्रामुख्याने आर्थिक अडचणीमुळे बंद पडली. वर्तमानात एकमेव ‘दैनिक बहुजन सौरभ’ आहे.

*साधारणतः प्रत्येक घटनेची वास्तव माहिती समाजापर्यंत पोहचवण्याचे कार्य प्रसार माध्यमांचे आहे. प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. वृत्तपत्रे ही सत्याचा आरसा दाखविणारी माध्यमे असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1920 मध्ये मुकनायक हे पाक्षिक सुरु करून पत्रकारितेच्या नव्या युगाचा प्रारंभ केला.*

त्याचीही गंभीर आर्थिक संकटातून वाटचाल सुरू आहे.नागपूर ही दीक्षाभूमी, क्रांतिभूमी! नागपूर शहरात आणि आजूबाजूच्या परिसरात जवळपास 19 लाख आंबेडकरी समाज असल्याचे सांगण्यात येते. परंतु त्याप्रमाणात वाचक वाढले नाहीत. सौरभ आता पाच वर्षाचा झाला. ‘दैनिक बहुजन सौरभ’ हे जीवंत माणसाचे, जीवंत वृत्तपत्र, असल्यामुळे त्याला जगवणे ही काळाची गरज आणि प्रत्येकांची जबाबदारी आहे. ही जबाबदारी कृतीत असावी, दिसावी म्हणून 15 डिसेंबर 2024 पासून धर्मेश प्रसेनजीत, श्रीराम बनसोड, नरेश धोपटे, विनय वनकर, भगीरथ मेश्राम हे दर सोमवारी प्रचार प्रसारासाठी दारोदार जात आहेत. ते प्रत्येक सोमवारी सकाळी वेगवेगळ्या परिसरातील नागरिकांच्या घरी जाऊन सौरभचे महत्व व गरज समजाऊन सांगत आहेत. या प्रवासात बरेवाईट अनुभव मिळाले. त्यातून समाजाचा कल समजला. बहुतेकांच्या घरात ‘लोकमत’ चा प्रवेश दिसला. त्यानंतर सकाळ, म.टा. या वृतपत्रांचे स्थान दिसून आले. पाच वर्षे झालीत पण काहींना तर बहुजन सौरभची माहिती नसल्याचे कळल्यावर आश्चर्य वाटले. लोकमत वृत्तपत्र वैचारिक नाही पण प्रस्थापित आहे. बहुजन सौरभ वैचारिक आहे पण प्रस्थापित नाही व श्रीमंतही नाही. घर घर बहुजन सौरभच्या प्रचारात खालील बाबी लक्षात आल्या, त्या म्हणजे :- 1. मोबाईल क्रांतीमुळे वाचन संस्कृतीचा झपाट्याने लोप होत आहे. वृत्तपत्र विकत घेतले पाहिजे अशी आज प्रवृत्ती नाही. या वृत्तपत्राची केवळ चारच पाने असल्याचे सांगून काहींनी इतर वृत्तपत्राकडे बोट दाखवले. 2. बुद्धांचे तत्वज्ञान, आंबेडकरी चळवळ जाणून घेण्यात अनेकांची आस्था दिसली नाही. बुद्ध धम्म व डॉ. बाबासाहेब आम्हाला कळले आहे, त्याचे ज्ञान आहे. त्यासाठी वृत्तपत्र कशाला हवे. त्या साहित्यावर अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत, असेही काहींनी सुनावले. परंतु डॉ. बाबासाहेबांच्या आईचे नाव काय होते? गरिबीमुळे रमाईचे किती मुले दगावली? डॉ. बाबासाहेबांचे उच्च शिक्षण कुठे झाले? अशा प्रकारच्या साध्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकले नाही. 3. रमा नगरात राहणारे एक समता सैनिक म्हणतात, बहुजन सौरभ हे आरएसएससाठी कार्यरत आहे. अर्थात त्यांचा भ्रम दूर करण्यास आम्हाला वेळ लागला नाही, ही बाब वेगळी. 4. नवीन पीढी वृत्तपत्र न वाचता मोबाईलवर बातम्या पाहणे पसंद करतात. आम्ही PDF वर सौरभ वाचतो, त्यामुळे वृत्तपत्राची गरज नाही, अशी काहींची धारणा आहे. 5. आंबेडकरी चळवळ दुभंगल्यामुळे आंबेडकरी वृत्तपत्रा-विषयी अनास्था निर्माण झाल्याचा अनुभव आला.6. ‘वाचाल तर वाचाल’ असे म्हटले जाते. परंतु आज वाचन संस्कृतीच लयास गेली आहे. अनेक सेवानिवृत्त पेंशनधारी वृत्तपत्र विकत घेणे अनावश्यक खर्च समजतात. त्याऐवजी ते मित्रांसोबत टवाळक्या करणे, अधूनमधून पार्ट्या करण्यात आनंद मानतात. 7. दिवसाच्या सुरुवातीला घरी गेल्यामुळे काहींच्या कपाळावर आठ्या पडलेल्या दिसल्या. कुणीतरी वसुलीवाले, वर्गणीवाले आले म्हणून दुरूनच ‘काय काम आहे’ असे झिडकारतात. ‘घरात या’ अशी संस्कृती जपणारे क्वचित आढळतात.8. सौरभ बद्दल माहिती दिल्यावर, वृत्तपत्र महाग असल्याचे काही व्यवहारी ज्ञान देतात. हे वृत्तपत्र प्रत्येक दिवशी वैचारिक खाद्य देणारे आहे, याला महत्व दिले जात नाही. आपले समाजासाठी काही देणे आहे ही बाब गौण ठरते. महिना दीडशे रुपये म्हणजे खूप होतात अशी मानसिकता असणारे, लग्न समारंभात लाखो रुपयाची उधळपट्टी करतांना दिसतात. 9. काही कुटुंबातील प्रमुख-कर्ता सकाळी उशीरापर्यंत झोपलेले असल्याचे अनुभवास आले. बहुजन सौरभ बद्दल माहिती देत असता, ते आमच्याकडे रिकामटेकडे असल्याच्या नजरेने पाहतात. 10. अनेक प्रसंगी ‘अहो आमच्याकडे बहुजन सौरभ येतच होता’ आम्ही पुण्याला गेलो आणि वेंडरने वृत्तपत्र बंद केले. यालाच बँकेच्या भाषेत ‘रेव्हेन्यू लिकेज’ म्हणतात. त्यांच्या वरांड्यात पडलेले लोकमत कसे चालू आहे असा आमचा प्रतिप्रश्न असतो. त्यावर त्यांचे उत्तर नसते. 11. सौरभ मध्ये चुका असतात, म्हणून हे वृत्तपत्र विकत घेत नाही असे म्हणणारेही भेटले. चुका दुरूस्ती साठी मदत करा, सौरभ कार्यालयाला भेट द्या, असे सुचवल्यावर निरुत्तर होतात. 12. सदर अभियानात अनेकांचे मोबाईल नंबर आम्ही संग्रही ठेवत असतो. आपल्याकडे सौरभ चालू झाला काय? अशी विचारणा केली तेव्हा ते ‘पुढच्या महिन्यात’ नक्की सुरू करू’ अशी भलावण करतात, कारण त्यांचा पुढचा महिना कधीच येत नसतो. असा महिना कोणत्याही कॅलेंडर मध्ये अस्तित्वात नाही, हे विसरतात. सौरभच्या संपादकाने असे केले पाहिजे, तसे केले पाहिजे, असे उपदेश देणारे महामानव असतात. 13. वरील प्रकारचे विविध अनुभव मिळाले असले तरी ‘आपण आमच्या घरापर्यंत आले, त्यामुळे आम्ही सौरभ सुरू केले’ असे शब्द कानावर पडतात तेव्हा आमच्या उत्साहात भर पडते. 14. समाजाप्रती समर्पित असलेल्या कुटुंबात बहुजन सौरभ वाचले जातात, तेव्हा समाधान वाटते. ‘घर घर बहुजन सौरभ अभियाना’त आलेल्या निवडक अनुभवाचा उल्लेख येथे केला आहे. शेवटी आंबेडकरवादी समजणाऱ्या प्रत्येकाचा सौरभच्या प्रचार प्रसारात सहभाग असावा, असे मनोमन वाटते. नागपुरात वेगवेगळ्या परिसरात असे अभियान चालू व्हावे. तरुण भारत या वृत्तपत्रास कोणताही ब्राम्हण विसरत नाही. त्याप्रमाणे दैनिक बहुजन सौरभ ही एक चळवळ समजली पाहिजे. या वृक्षास खतपाणी घालण्यात सर्वांचे योगदान गरजेचे आहे. बहुजन सौरभ घराघरात वाचले जावे, त्याद्वारे समाज प्रबोधन व्हावे, ही अपेक्षा!! ■■



श्रीराम बनसोड
मो. 8208617748

# तोंडी आरोग्य का महत्वाचे आहे ?




डॉ. स्नेहल सोनारकर (सूर्यवंशी)
मो. 9967111642

इतर देशापेक्ष्या भारतात मुख आरोग्य सर्वांत दुर्लक्ष केलेला भाग आहे. तोंडी आरोग्य हे फक्त एक उज्वल स्मित किंवा ताजे श्वास घेण्यापेक्षा बरेच काही आहे. हे आपल्या एकूण आरोग्याचा आणि कल्याणचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. तोंडी आरोग्यासाठी महत्त्वाची कारणे येथे आहेत.

**1. तोंड शरीराचे प्रवेशद्वार आहे :** आपले तोंड आपल्या पाचन आणि श्वसन प्रणालीचा प्रवेश बिंदू आहे. अस्वच्छ तोंड जीवाणूंना रक्तप्रवाहात प्रवेश करण्यास मदत करतात, ज्यामुळे शरीराच्या इतर भागात संक्रमण वाढते.

**2. प्रणालीगत रोगांचा दुवा :** मुख आरोग्य अनेक गंभीर आरोग्याच्या परिस्थितीशी जवळून जोडलेले आहे - **1)हृदयरोग :-** हिरड्याचा रोग, हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकच्या वाढीव जोखमीशी जोडलेला आहे. 2) **मधुमेह :** खराब मुख आरोग्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करणे कठीण होते. **3)गर्भधारणेची गुंतागुंत :** हिरड्यांच्या संसर्गामुळे अभ्रकाचा अकाली जन्म आणि त्याच्या वजनात घट होऊ शकते. **4)श्वसन संक्रमण :** तोंडातून बॅक्टेरिया प्रवेश केल्यामुळे फुफ्फुसांमध्ये श्वास घेण्यात अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे न्यूमोनिया आणि इतर श्वसन विकार होऊ शकतात. **3) वेदना आणि अस्वस्थता प्रतिबंध :** पोकळी, डिंक रोग आणि दंत संक्रमणांमुळे तीव्र वेदना होऊ शकतात, ज्यामुळे खाणे, बोलणे किंवा एकाग्रता करणे कठीण होते.

**4) निरोगी स्मित :** एक निरोगी स्मित आपला आत्मसन्मान आणि आत्मविश्वास वाढवतो, वैयक्तिक, सामाजिक आणि व्यावसायिक जीवनावर सकारात्मक परिणाम होतो.

**5) दीर्घकाळ पैशाची बचत करते :** प्रगत क्षय, डिंक रोग किंवा दात गळतीच्या उपचारांपेक्षा नियमित तपासणी आणि क्लीनिंग्ज सारखी प्रतिबंधात्मक काळजी अधिक परवडणारी आहे.

**6)जीवनाची गुणवत्ता :** तोंडी आरोग्याचा अर्थ असा आहे की आपण आपल्या आवडत्या पदार्थांचा आनंद आपण घेऊ शकतो, स्पष्टपणे बोलू शकतो आणि दंत समस्यांमुळे होणारी लाजिरवाणे किंवा अस्वस्थता टाळू शकतो.

**7) आजीवन आरोग्यासाठी पाया :** बालपणात तयार झालेल्या चांगल्या सवयी आयुष्यभर मजबूत, निरोगी दात आणि हिरड्या सुनिश्चित करतात.

**तोंडी आरोग्य कसे टिकवायचे?**

1. फ्लोराईड टूथपेस्टसह दिवसातून दोनदा ब्रश करा. 2. दररोज फ्लॉस करणे. 3. दर 6 महिन्यांनी आपल्या दंतचिकित्सकास भेट देणे. 4. साखरेचे प्रमाण, स्नॅक्स आणि पेय मर्यादित करणे. 5. तंबाखू आणि अत्यधिक अल्कोहोल टाळणे. ■■

# सदिच्छांची थाप...






अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

याच महिन्यात 8 जून रोजी अड्याळ टेकडी, ब्रम्हपुरीचे तुकारामदादा गीताचार्य यांचा निर्वाण दिवस होता. त्या निमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मनोगत वाचनात आले. ते वाचत असतांना त्यांच्या सहवासाची स्मृती जागी झाली. माध्यमात काम करीत असतांना असंख्य व्यक्ती संपर्कात येत असतात. मी आकाशवाणीत सेवारत असल्याने शेतकरी, कलावंत, कवी, लेखक, विविध क्षेत्रातील तज्ञांशी मुलाखत स्वरूपात संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यापैकी एक तुकारामदादा गीताचार्य यांची मुलाखत स्मृतिचित्रात कायम कोरली गेली आहे.

माझे अधिकारी श्री. डी. के. पिंपळघरे यांनी सूचना केली की आपण तुकारामदादांची मुलाखत आकाशवाणीत संग्रही असण्यासाठी घेऊ. मी होकार दिला. त्यानंतर आम्ही त्यांच्याशी अड्याळ टेकडी, ब्रम्हपुरी येथे संपर्क स्थापण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या सहकाऱ्यांना आम्ही पूर्व कल्पना दिली. फोनवर संपर्क ठेवला. पण दादा कायम लोकांच्या प्रश्नासाठी फिरतीवर राहत असल्याने लवकर योग जुळून आला नाही. सातत्य ठेवल्याने ही संधी मिळाली.

आम्ही चंद्रपूरवरून सकाळी आठ साडेआठ दरम्यान निघून बाराच्या आसपास अड्याळ टेकडीला पोहोचलो होतो. दादा गावातच होते पण लोकांच्या कामाने बाहेर होते. त्यांना आम्ही आल्याचा निरोप गेल्यावर ते काही वेळानंतर आलेत. आल्या आल्या त्यांनी अड्याळ टेकडी परिसर दाखवला. त्यांनी विकसित केलेल्या कामाची आणि उपक्रमांची माहिती दिली. त्यामुळे मुलाखत घेण्याआधी औपचारिक गप्पात त्यांचे अंतरंग उलगडण्याचा माझा प्रयत्न सफल होत होता. चहा आटोपल्यावर एका शांत खोलीत आम्ही मुलाखत ध्वनिमुद्रण सुरू केले. त्यांनी आधी म्हटले, ‘मी फार बोलणारा माणूस नाही.’ दादा कामावर विश्वास असणारी व्यक्ती आहेत याची जाणीव होतीच. ग्राम स्वराज्याच तसेच ग्रामगीतेला अभिप्रेत समाज, ग्रामीण जीवन साकारण्याचा ध्यास, त्यांचे स्वप्न होते हे आम्ही जाणून होतो.

मुलाखत त्यांच्या बालपणापासून सुरू झाली. त्यातील गमती जमती, गावातील सवंगडी, विवाह त्यात अडकून न पडता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या सोबत कार्यरत होणे. त्यासाठी वाहून घेणे. लोकांशी संवाद साधून गावाला स्वयंस्फूर्त करण्यासाठी कार्यक्रम राबवणे. त्यात आढळलेला लोकांचा दृष्टिकोन, राजकीय व्यक्तींशी संवाद साधून ग्राम विकासासाठी केलेले प्रयत्न, कामा दरम्यान आलेल्या अडचणी अश्या विविधांगी विषयावर दादा मोकळेपणाने बोलते झाले आणि मुलाखत जवळपास सव्वा तास चालली. ‘मागे वळून बघतांना आता कोणती भावना आहे?’ या माझ्या शेवटच्या प्रश्नावर ते क्षणकाळ थांबले आणि ‘तृप्त’ असल्याच सांगितले. मुलाखत संपल्यावर त्यांनी माझ्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन म्हटले, ‘खूप बोलत केले आज तुम्ही.’ पुढे म्हणाले, ‘तुम्ही थांबा, मी एक काम आटोपून येतो. आपण मिळून जेवण करू, त्याशिवाय जायचे नाही.’ त्यांना येत पर्यंत आम्ही आमचे ध्वनिमुद्रणाचे सामान जमा केले. ते लवकरच परतले. आम्ही मिळून पंगत भोजन घेतले. एका त्यागी व्यक्तीच्या सानिध्यात भोजन करण्याची संधी मिळाल्याने समाधानाचा भाव होता. त्यांची ती कौतुकाची थाप जेंव्हा आठवते तेंव्हा एका व्रतस्थ व्यक्तीच्या सदिच्छा पाठीशी असल्याची भावना मनात कायम येते. ■■

# क्रूर क्रोधी परशुराम सत्तेत येताच

## गुलाम मराठ्यांचे आणि स्वाभिमानी आंबेडकरी समाजात भांडणे लावतो!

*1 जानेवारी 2018 मधे सत्तेत येताच पूर्व नियोजित एकबोटे आणि मन्या कुळकरण्या म्हणजे नकली संभा भिड्या ला पुढे करून याच क्रूर क्रोधी परशुरामाने भीमा कोरेगाव ला दंगल घडविली त्यात करोडो रू.चे आंबेडकरी समाजाचे भीम अनुयायांचे नुकसान झाले उलट भीम आनुयायांवर खटले दाखल केले अजूनही काही आंबेडकरी तरुण जेलमध्येच आहेत.*

काहींचे संसार उद्‌ध्वस्त झालेत. दंगल घडविणारे एकबोटिनी मन्या कुलकरण्या मनुमनोव्याधिग्रस्त बाहेरच परशुरामाच्या संरक्षणात आहे, तशीच घटना 2024 ला परभणीत घडली. मनुमनोव्याधिग्रस्त पोलीस परशुरामाचे दानवी प्रवृत्तीचे घराघरात घुसले तरूण तरुणींना मारायला लागलेत मागास जात म्हणून पेशवाईत आंबेडकरी समाज जो वाळीत टाकल्या गेला. त्या महिलांच्या अंगावर पायावर उभे होऊन हे दानव पोलीस परशुरामाचे प्रवृत्तीचे काठी-काठीने मारायला लागलेत. निंवस्त्र करून मारणारे माणसे राहूच शकत नाही ते परशुरामाचे दानवि प्रवृत्तीचे पोलीस होते सरकारच दानव परशुरामाचे मग मानवी समाजाला कसे जगू देणार? याच परशुराम सोबत जे भीमा कोरेगावला दंगल घडविणारे एकबोटे मन्या कुळकर्ण्या सारखे प्रवृत्तीचे तेच परभणीमधे होते आणि यात सर्वात शर्मेची बाब अमानवीय कृत्य म्हणजे सोमनाथ सुर्यवंशीचा जीव घेणारे पोलीस, दानवी अत्याचारी घृणास्पद अघोरी कृत्य करणारे प्रवृत्तीचे शासनकर्ते पोलीस अधिकारी कर्मचारी प्रशासन व्यवस्था ज्यांची माणसात गीणतीच करता येणार नाही आणि हे सर्व आंबेडकरी समाजाचे नेते उघड्या डोळ्यांनी पहात होते जे परशुरामाच्या सरकारसोबत होते प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आपल्याच समाजावर आया बहिणींवर तरुण तरुणींवर अत्याचार करून घेत होते हे सर्व झाल्यावर सोमनाथ सुर्यवंशीचा जीव त्या कुटुंबाची अत्याचाराची किंमत दहा लाख रुपये मध्ये लावत होते अश्या घटना इतिहासात भारतात इंग्रज मोघलानी सुध्दा घडविल्या नाहीत धर्मराजे छत्रपती संभाजीला औरंगजेबाकडे सोपऊन छ्ल बेहाल करून शरीराचे तुकडे करून नदीत फेकणारे हेच परशुरामाचे समर्थक होत जे स्वयंघोषित राजे आज स्वतःला मराठे म्हणून मिरवितात जे परशुराम पेशव्याला साथ देतात 2015 ला भारतात याच स्पृश्य मित्र सृंगचे पेशवाई सरकार बसले आणि मुळ भारतीय मानवी समाजाच्या अत्याचाराला शोषणाला सुरुवात झाली न्यायाधीश न्यायव्यवस्था सर्व शासकीय प्रशासकीय अधिकारी कर्मचारी दलाल झाले खाजगीकरण झाले कोरोनाच्या नावाने मानवी अवयवांची तस्करी झाली करोडो रू. स्पृश्य मित्र सुरुंग शासनाने कमविले जे निवडणुकांमध्ये सत्ता काबीज करण्यासाठी उपयोगी पडले नोटबंदी करून गरीब शेतकऱ्यांचे कर्मचारी रोजमजुरांचे शोषण केले. मणिपूर पुलवामा खैरलांजी जवखेडा अमानुष कृत्य क्रूर अत्याचार स्त्रियांना स्नग्न करून धिंड काढली बंदुकीच्या गोळ्यांनी जीव मारून टाकले. हे कृत्य माणूस करीत नाही, जे दानव प्रवृत्तीचे असतात तेच करतात. ती प्रवृत्ती म्हणजेच स्पृश्य मित्र सुरुंग, परशुराम पेशवा हो यानी त्यांचे समर्थक दुसरे कोणी नसुन छत्रपती धर्मराज राजे संभाजीचा छळ बेहाल करून शरीराचे तुकडे करून नदीत फेकणारे हेच स्वयंघोशित आजचे स्वतःला राजवंशी म्हणतात, तेच सत्तेत बसलेले राजकारणी होत स्वतंत्र भारताचे हे स्वप्न प्राणाची आहुती देणाऱ्या एकही हुतात्म्यांनी बघितले नाहीत जे आज भारतात घडत आहे. ■■



अनिरुद्ध शेवाळे
9823368332

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA






## प्रबुद्ध विहार पारडी

हे भांडेवाडी पारडी परिसरातील अतिशय जुन्या विहारांपैकी एक विहार . स्थापना 1963 विहाराची नोंदणी धर्मदाय संस्थेमार्फत झाली . प्रबुद्ध विद्यार्थी मंडळ पारडी अध्यक्ष पारेश्वर वैरागडे , सचिव सुनील उपरे आहे. प्रत्येक रविवारी इंग्लिश स्पिकिंग कोर्सेस असून शैक्षणिक वर्ग सुरू आहे.

संवाद मित्र,
भदंत नागदिपंकर महास्थविर
9423605550

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्कसाठी नासूप्र व मनपा आयुक्तांना निवेदन

**नागपूर :** बाबासाहेब आंबेडकर इंटर नॅशनल नारा पार्क नागपूर च्या सुधारित डी.पी.प्लान मध्ये आरक्षित करण्या बाबत मनपा आयुक्तांना निवेदन महाराष्ट्र शासनाच्या 2001च्या आरक्षित धोरणानुसार महानगर पालिकेने उत्तर नागपूर या ठिकाणी 130 ऐकर जागेवर नारा पार्क साकार होण्याकरिता जमीन आरक्षित करून पार्कचे टेंडर सुद्धा काढण्यात आले. परंतु काही दिवसानंतर जसे सूर्याला ग्रहण लागते. तसेच नारा पार्क ला सुद्धा ग्रहण लागले . वेदप्रकाश आर्य यांनी पार्कची धुरा हाती घेवून काही वर्षापासून प्रशासकीय आणि कोर्टात लढा देत आहेत. विशेष म्हणजे वेदप्रकाश आर्य आणि सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी एकत्रित येवून महाराष्ट्रातील विधान सभेच्या निवडणुकीच्या पूर्व संधेला 2 ऑक्टोंबर 2024 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल नारा पार्कच्या जागी आंदोलन सुरू केले जेणे करून शासन दखल घेईल. आणि ताबडतोब निर्णय घ्या. 11./6./2024.ना.सु.प्र.ने नारा पार्कच्या 130 एकर जागेवर एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट च्या मथळ्याखाली नागपूर सुधार जाहिरातीच्या अनुसंघाने मा.ना.सु.प्र. सभापती यांच्याशी चर्चा केल्यानंतर असे समजले की निधी अभावी जमिनीचे संपादन करणे शक्य नाही या नकारात्मक भूमिकेमुळे नारा पार्क झाले पाहिजे याकरिता





आंदोलन, नारे निदर्शने ,विधान भवनावर मोर्चा काढण्यात आला. उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विधान सभे मध्ये नारा पार्क साकार होण्याकरिता प्रश्न उपस्थित केला. मुंबईला अधिवेशन सुरू असताना नितीन राऊतच्या नेतृत्वात तातडीने विधान भवन मुंबई येथे नारा पार्कचे शिष्ट मंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, पालकमंत्री, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले. मंत्री मोहदयांनी पुढे चर्चा करण्यास बोलावू आणि शासनाचा प्रतिनिधी प्रत्यक्ष भेट देण्यास आश्वासन दिले. त्यानुसार पालकमंत्र्यांनी 14 ऐप्रिल रोजी आंदोलन स्थळी भेट दिली.

270 दिवस झाले तिथे आंदोलन सुरू आहे अजूनही पत्र वेव्हार सुरू असताना दिनांक 11.6.2025 रोजी आयुक्त नागपूर महानगर पालिका, यांनी सुधारित नागपूर शहर विकास आराखडा तयार करण्याची जाहीर सूचना प्रसिद्ध केली त्या अनुषंगाने आज दि.23.6.2025.आयुक्त, ना.म.पा.यांच्याशी भेट घेवून निवेदन दिले त्याच प्रमाणे नागपूर नगर रचना विभागाचे संमधित अधिकारी काझी यांच्याशी चर्चा करून निवेदन दिले.त्यांनी आस्वस्थ केले की शक्य तेवढ्या लवकर स्मश्याच निराकरण करू.

नवीन सुधारित आराखड्यात मध्दे 130 ऐकर जगेचा समावेश कायम ठेवावा आणि पार्कचा विकास करावा या करिता वेद प्रकाश आर्य आणि समितीचे मुख्य संयोजक सुनील लांजेवार, सल्लागार ॲड हंसराज भांगे समितीचे सदस्य पुष्पा घोडके, सुधा चौधरी प्रमिला तेंभेकार, संघमित्रा रामटेके, शारदा मोढघरे, वर्षा ठेंभेकर नरेश महाजन, विजय सुरवाडे, शेखर पाटील, हरिश नारनवरे, माजी नगरसेवक मुरली मेश्राम, राजेंद्र गजभिये, भीमराव मेश्राम, पांडुरंग जगताप, माया घोरपडे, राजकुमारी पोफरे अनेक कार्यकर्त उपस्थित होते .

# घर घर बहुजन सौरभ अभियानांतर्गत प्रगतीचा शोध



**नागपूर :** घर घर बहुजन सौरभ अभियानाचे प्रचारक धर्मेश प्रसेनजीत, श्रीराम बनसोड, विनय वानकर यांनी 23 जून 2025 रोजी नेहमीप्रमाणे नवीन परिसरात अभियान न राबवता मागील सहा महिन्यात या अभियानामुळे किती प्रगती झाली याचा शोध घेतला. अभियानाच्या सुरूवातीस नरेंद्र नगरातील अनेक सोसायटीमध्ये हा उपक्रम राबविला होता, त्याच लोकांच्या पुन्हा भेटी घेऊन बहुजन सौरभ किती लोकांनी सुरू केला याचा मागोवा घेतला. काही नागरिकांनी अभियानामुळे बहुजन सौरभ सुरू केल्याचे समाधान वाटले, परंतु काहींनी विविध कारणे सांगून सदर वृत्तपत्र सुरू करण्यास नकार दिला. काहींनी तर शाहू-फुले-आंबेडकरी विचाराच्या या वृत्तपत्रास दुर्लक्षित करून इतर वृत्तपत्र जिव्हाळ्याचा असल्याचे सांगितले.

अशा प्रकारचे अभियान नागपुरात विविध ठिकाणी सुरू करणे गरजेचे असल्याचे नरेंद्र नगर निवासी शिवदास वासे यांनी सांगितले. आंबेडकरी समाजात बहुजन सौरभ हे वृत्तपत्र अत्यंत दर्जेदार असल्याचे सांगून ते सतत या वृत्तपत्राचा प्रचार करत असतात. या प्रसंगी सुरेखा शिवदास वासे यांनी बहुजन सौरभला पाच हजार रुपयाची आर्थिक मदत घोषित केली.

## महत्वाचे

### रोजगार मार्गदर्शन शिबिर यशस्वी

**नागपूर :** रोजगार मार्गदर्शन शिबिर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन हॉल, लष्करीबाग, नागपूर येथे मापरल ग्रुप ऑफ कंपनीचे संचालक प्रमोद जे. संगोडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. या शिबिराला विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते, तसेच ज्येष्ठ खेळाडू व प्रशिक्षक श्रावण घोडमारे, उमाकांत संगोडे आणि मुंबई येथील आर्थिक सल्लागार देवेंद्र कुमार पांडे यांनी विशेष उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाचे समन्वयक रोशन राऊत यांनी शिबिराची सविस्तर माहिती दिली. प्रमोद संगोडे यांनी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी आणि मुंबई व पुणे येथे स्थलांतर करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी उपलब्ध ऑफर्सबाबत तपशीलवार माहिती दिली. सुमारे 150 उमेदवारांनी विविध पदांसाठी ऑनलाइन नोंदणी केली. विद्यार्थ्यांना निवासासह अनेक संधी उपलब्ध करून देण्यात आल्या असून, पुढील टप्प्यात ऑनलाइन आणि प्रत्यक्ष मुलाखती होणार आहेत.

### उंटखाना येथे भिक्खूनी संघाचे आगमन



**नागपूर :** रमाई स्मारक बुद्ध विहार उंटखाना येथे भिक्खूनी संघाचे आगमन झाले. विहारात त्यांचे स्वागत श्रद्धावान उपासिकांनी केले. बुद्ध वंदना घेऊन भिक्खूनी संघाने प्रथमतः उंटखाना परिसरात चारिका केली. उंटखाना परिसरातील सर्व श्रद्धावान उपासक उपासिकांनी अधिम पात्रात भोजनदान देऊन असिम पुण्य केले. कार्यक्रमाचे आयोजन रमाई स्मारक बुद्ध विहारातील भिक्खूनी विसाखा विभुती, करुणा शीला, मेन्ताचित्त तसेच रमाई स्मारक बुद्ध विहार मंडळ समितीच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला. असे कार्यक्रम झाले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारत बुद्धमय कण्याचे स्वप्न साकार होईल.

### राज्यव्यापी सामाजिक न्याय द्या अभियान 26 जूनला

**नागपूर :** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने 26 जून रोजी, 'सामाजिक न्याय दो' अभियाना अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून नारे-निदर्शन करण्यात येणार आहेत. आंबेडकरी महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्ष अभियानाचे नेतृत्व करणार आहेत, असे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी माध्यमांना सांगितले. विशेष सामाजिक न्याय विभागात काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांना चांगली वागणूक देण्यात येत नसल्याचे आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या निदर्शनास आले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी राज्यव्यापी आंदोलनाचे निर्देश दिले. राज्यातील विविध पोलिस ठाण्यांत अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यात यावी, रमाई घरकूल योजनेची अंमलबजावणी यशस्वी करण्यात यावी, या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार असून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे जनसंपर्क प्रमुख डॉ. कृष्णा बेडसे तसेच महाराष्ट्र प्रदेश धुळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.

## डॉ. भीमराव आंबेडकर यांची दलाई लामा यांच्याशी ऐतिहासिक भेट

बौद्ध धम्म प्रचारासाठी विशेष शिबिर व पुढील कृती आराखडा ठरवीला

हिमाचल प्रदेश प्रशिक सम्राट यांस कडून जागतिक धम्म गुरू आणि शांततेचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे परम पावन दलाई लामा यांची भेट भारतीय बौद्ध महासभेच्या शिष्टमंडळाने दि. 20 जून 2025 रोजी धर्मशाला येथील निवासस्थानी घेतली, या शिष्टमंडळाचे नेतृत्व दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभेचे ट्रस्टी आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी केले. त्यांच्यासमवेत डॉ. राजेंद्र पाल गौतम, कॅप्टन प्रवीण निखाडे, ॲड. एस.के. भंडारे, ॲड. एस. एस. वानखडे, पद्माकर गणवीर, मल्लिकार्जुन भालके तसेच कर्नाटक राज्याचे एस. सिद्धराजू, एम.सी. शिवराज, केसरी, संदीप आर्या, भीमराव सावतकर, त्रिभुवन, प्रवीण साळवे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते, या भेटीदरम्यान दलाई लामा यांनी भारतीय बौद्ध समाजाच्या



कार्याचे कौतुक करताना धम्माच्या प्रचार व प्रसारासाठी नवे विचार आणि मार्गदर्शन दिले. त्यांनी जागतिक स्तरावर शांती, करुणा आणि मैत्रीचा संदेश पोहोचवण्यासाठी भारतीय संघटनांना अधिक संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले. भेटीसोबतच धर्मशाला येथे भारतातील प्रमुख बौद्ध संघटनांच्या प्रतिनिधींचे तीन दिवसीय विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी विविध राज्यांमध्ये जनजागृती मोहीमा राबविण्यास एकमताने संमती दिली. ही भेट व शिबिर भारतीय बौद्ध चळवळीच्या दृष्टीने अत्यंत ऐतिहासिक ठरली असून येत्या काळात या चर्चांचा सकारात्मक परिणाम देशभर पाहायला मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## 'नागपूरातील स्त्रीरत्ने' ग्रंथ प्रकाशित

**नागपूर :** साकारासाठी आकाराचा अभाव असेल तर कुणाला तरी नियोजकाच्या भूमिकेत शिरावे लागते. नागपूरातील स्त्री रत्नांसंबंधी लिखाण करताना ही अभूतपूर्व कामगिरी जयश्री पेंढारकर आणि स्मिता खानझोडे यांनी



निष्ठेने केली. असे गौरवोद्गार दत्ता मेघे उच्च शिक्षण व अनुसंधान संस्था अभिमत विद्यापीठाचे प्र. कुलगुरू, डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी काढले. जयश्री प्रकाशना तर्फे 'नागपूरतील स्त्री रत्ने' या ग्रंथाच्या प्रकाशनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. या प्रसंगी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या भूतपूर्व अधिष्ठाता डॉ. विभावरी दानी, ग्रंथाच्या संपादक डॉ. जयश्री पेंढारकर आणि लेखिका स्मिता खानझोडे उपस्थित होते. राम शेवाळकर सभागृहात हा समारंभ पार पडला. डॉ. मिश्रा पुढे म्हणाले प्रेरणेची पुल्लिंग चेतवणाऱ्या स्त्रियांना समाजातर्फे ऋणानुबंधाचा प्रतीकात्मक स्वर लाभेल अशी व्यवस्था निर्माण करावी, असे आव्हानही मिश्रा यांनी केले. डॉ. विभावरी दाणी म्हणाल्या की, स्त्रियांच्या दृष्टीने इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक आहे. स्त्री रत्ना तर्फे लेखिका आणि मोबाईलच्या विळख्यात अडकलेल्या तरूणाईला 'पोरी जरा जपून' या कार्यक्रमाद्वारे जागरूक करणाऱ्या विजया मारोतकर यांनी मनोगत व्यक्त केले. संचालन प्रज्ञा बागलकोट यांनी तर आभार प्रदर्शन स्मिता खानझोडे यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते स्त्री रत्नांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शुभांगी भडभडे, नंदा जिचकार, आरती सावजी, शिवाली देशपांडे, प्रेरणा जामदार, मीरा औरंगाबादकर, मौसमी कटरे या स्त्री रत्नांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## टेकॉप्स सिटी परिसरात 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

**नागपूर :** योग आणि मार्शल आर्टचे जनक तथागत भगवान गौतम बुद्ध आहेत. योग हे भारतीय लोकांची परंपरा दिसून येते, आजपर्यंत आपल्या भारतात तथागत भगवान बुद्ध आणि



महावीर यांच्याच मूर्ती योग मुद्रा मध्ये दिसून येतात. आनापानसती या भगवान बुद्धाच्या ध्यान साधनेच्या योगाभ्यासास, संस्कृत मध्ये लोम अनुलोम असे म्हटले जाते. 21 जून योग दिवसाचे औचित्य साधून टेकाप्स सिटी परिसरात डॉ. प्रियतमा दास नॅचरोपॅथी सेंटर तसेच नगरपंचायत सदस्य, बाळूभाऊ घोडमारे यांनी साई मंदिर येथे दोन दिवसीय योग शिबिराचे आयोजन केले. या कार्यक्रमाला डॉ. निखिल सेलोकर, कर अधिकारी सागर ठाकरे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी नगरपंचायत बहादूरा साहस कुमार करनाडे, भोजराज घोडमारे, खान, दास, सचिन भोयर, डॉ. प्रियतमा दास, मिनू हेडावू, अध्यक्ष लेडीज महिला क्लब हाऊस या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला टेकऑफ सिटी परिसरातील आणि गार्डन परिसरातील वरिष्ठ महिला तसेच पुरुष मंडळी आणि संपूर्ण टेकॉप्स परिसरातील महिला, मुले, मुली उपस्थित राहून योगाभ्यासाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संचालन नीता ढवळे यांनी केले असून, आभार संध्या घोडके यांनी केले.

## सिटूच्या आशानी जिल्हाधिकारी यांना विविध प्रश्नावर दिले निवेदन



**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयु) तर्फे आशा वर्कर यांनी निवासी जिल्हाधिकारी -अनुप खांदे यांना मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, वित्तमंत्री, आरोग्य राज्यमंत्री, महसूल मंत्री, आयुक्त - राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे नावे निवेदन सादर केले. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचेवर केंद्र व राज्य सरकारने निर्माण केलेले संकट. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना जानेवारी 2025 पासून केंद्राचे कोणतेही मानधन मिळालेले नसुन राज्य किंवा जिल्हा प्रशासन सकारात्मक उत्तर द्यायला तयार नाही. राज्य शासनाचे सुद्धा मानधन मार्च 2025 पासून थकीत असून त्यावर सुद्धा राज्य शासन तोडगा काढायला तयार नाही. अशा परिस्थितीमध्ये आशा वर्कर वर विविध प्रकारचे सर्वे ऑनलाइन करून देण्याच्या दबाव व परिवारावर आलेली उपासमारीची पाळी त्यामध्ये त्या संकटात सापडलेल्या आहेत. वरिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचेवर कामाचा ताण देत असून त्या विविध रोगाने ग्रस्त झालेले आहेत. आशा वर्करवर ऑनलाइन कामाची सक्ती न करता ऑनलाइन कामाकरता डाटा ऑपरेटरची नेमणूक करण्यात यावी. दर सहा महिन्याने त्यांची आरोग्य तपासणी होणे गरजेचे असून दर महिन्याच्या एक तारखेला केंद्र व राज्याचे मानधन त्यांच्या खात्यामध्ये जमा होणे गरजेचे आहे. 13 जुन 2025 रोजी आरोग्य सेवा व आयुक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्यातर्फे परिपत्रक क्रमांक राआअ/आशा/आशा अद्यावत मा.सु./27109-314 काढण्यात आले. आशा स्वयंसेविका यांच्यावर 60 वर्षांची वयोमर्यादा लादल्या जात असेल तर, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा अन्यथा कार्य समाप्तीनंतर 5 लाख रुपये एक मुस्त राशी व 10 हजार रुपये मासिक पेन्शन लागू करावे. आशा या स्वयंसेविका असल्यामुळे त्यांचे वर बडतर्फी किंवा कार्यमुक्ती ताईला लागू होऊ शकत नाही. ज्याप्रकारे 10 वर्ष पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्या प्रकारे 10 वर्ष पूर्ण झालेल्या आशा वर्कर यांना सुद्धा शासकीय सेवेमध्ये समाविष्ट करण्यात यावे. योजना तात्पुरत्या स्वरूपाची असल्यामुळे त्या योजनेला स्थायी योजना म्हणून घोषित करण्यात यावी, जे एस वाय अंतर्गत आशा वर्कर यांच्यावर लादण्यात आलेली एपीएल/बीपीएलची अट रद्द करून सरसकट मोबदला देण्यात यावा. शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास परत एकदा आशा वर्कर व गटप्रवर्तक संपावर जाण्याची संभावना व्यक्त करण्यात येत आहे. शिष्ट मंडळात कॉ. राजेंद्र साठे, प्रीती मेश्राम, रंजना पौनीकर, माया कावळे, लक्ष्मी कोत्तेजवार प्रामुख्याने उपस्थित होते.

## एमएच-ईएसआयएस हॉस्पिटल, सोमवारीपेठ, नागपूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**नागपूर :** एमएच-ईएसआयएस हॉस्पिटल, सोमवारीपेठ येथे 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डॉक्टर, रुग्णालय कर्मचारी आणि



रुग्ण यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. 'वन अर्थ, वन हेल्थसाठी योग' या वर्षीच्या संकल्पनेखाली, सर्वांगीण आरोग्य व योगाच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्यावर होणाऱ्या प्रभावावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात वैद्यकीय अधिक्षक डॉ. वैशाली व्यवहारे यांच्या स्वागत भाषणाने झाली. यावेळी डॉ. किशोर गिरी (ऋद्ध), डॉ. हर्षवर्धन कांबळे आणि डॉ. ईशान घुसे हे उपस्थित होते. त्यांनी योगाचा आरोग्यावर होणारा सकारात्मक प्रभाव अधोरेखित केला आणि सर्व उपस्थितांचे कौतुक केले.

योग सत्राचे मार्गदर्शन योग प्रशिक्षक मिसेस आकांक्षा नारनवरे यांनी केले. त्यांनी अतिशय सुंदर आणि सुलभ पद्धतीने योगासने, प्राणायाम व ध्यान शिकवले, जे सर्व वयोगटातील आणि आरोग्य स्थितीतील लोकांसाठी उपयुक्त ठरले. उपस्थितांनी त्यांच्या प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे एमएच-ईएसआयएस हॉस्पिटलमध्ये दररोज सकाळी 8 वाजता नियमित योग सत्र घेतले जाते, ज्यामुळे रुग्ण व कर्मचारी वर्ग यांना नियमित योगाचा लाभ मिळतो.

कार्यक्रमाचा समारोप नारनवरे यांनी आभार प्रदर्शनाने केला. त्यांनी सर्व मान्यवर, सहभागी आणि आयोजकांचे आभार मानून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

## म. फुले यांच्या अखंड गायनाने शाळा प्रवेश संस्कार!

**कामठी :** आज शाळेचा पहिला दिवस. पहिल्या दिवशी पहिल्या वर्गात बरेच विद्यार्थी दाखल झालेत. त्यांच्या प्रवेशा निमित्ताने शाळा प्रवेश संस्कार कार्यक्रम उच्च प्राथमिक शाळा शिवनी ता. कामठी जि. नागपूर या आमच्या शाळेमध्ये राबवण्यात आला. यात्रसंगी सर्वप्रथम गावांमधून प्रभातफेरी काढून शिक्षणासंबंधी जनजागृती करण्यात आली. प्रभातफेरी



शाळेच्या प्रांगणात प्रवेश करताच पहिलीत दाखल झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यात्रसंगी छोट्याशा शाळा प्रवेश कार्यक्रमांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भीमराव गोमकर, त्याचप्रमाणे माजी सरपंच भगवान कोरडे प्रामुख्याने उपस्थित होते. त्याचप्रमाणे शिक्षणप्रेमी पालक विनोद मांडवकर मातापालक प्रीती मेश्राम आणि शाळेला नेहमी श्रमदान करणारे, ज्येष्ठ नागरिक वानखेडे उपस्थित होते. मुख्याध्यापिका अल्का तिजारे आणि सहशिक्षक अनुज हुलके, रजनीगंधा वंजारी उपस्थित होते. सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पगुच्छ अर्पण करून सुरुवात करण्यात आली. महात्मा फुले रचित - 'सत्य सर्वांचे आदिघर सर्व धर्माचे माहेर...' अखंड गायन सर्व विद्यार्थ्यांनी केले. विद्यार्थ्यांना पहिल्या वर्गाचे पाठ्यपुस्तक आणि गणवेश मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. त्याआधी सर्व नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि फुगे लावून सजवलेल्या खुर्चीमध्ये बसवून स्वागत करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि शैक्षणिक सत्रासाठी शुभेच्छा दिल्या. उन्नत मानवी जीवनवादी संस्कार रुजवणारी सुरुवात होते आणि म्हणून मानवसमूहात इतर संस्कार पाळले जातात. त्याचप्रमाणे या शाळा प्रवेश संस्काराचे सुद्धा अनन्यसाधारण महत्त्व आहे. अशा प्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी अथकपणे मन लावून शिकावे आणि आपले भविष्य उज्वल करावे अशा प्रकारची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर चहा पाणी देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.




बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648